म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २९३८

# ऋतुवेगळे पहर



REFBK-0023585

ना.बा.ठेंगडी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

25 AUG 1983

08 MAR 1984

( क्रु. मा. प. )
५०००-४-८०

निबंध (ललित)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९३८
23559
निबंध ५।८।८२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ निबंध लेखि
२९३८
२३५९५
५।८।८२



# ऋतुवेगळे प्रहर

ना.

REFBK-0023585



प्रकाशक :
वसंत लुले
वसुधा प्रकाशन
जोशीवाडी सीताबर्डी
नागपूर - ४४० ०१२

पहिली आवृत्ती :
जानेवारी १९८२

किंमत :
पंधरा रुपये



मुद्रक :
मधुसूदन बनहट्टी
नारायण मुद्रणालय
२२४ टिकेकर रोड
धनतोली नागपूर - ४४० ०१२

मुखपृष्ठ मुद्रण :
मधुकर आर्टस्
धनतोली, नागपूर - ४४० ०१२




मुखपृष्ठ व मांडणी :
संजय धोतरकर
रेखाटणे :
भाऊ समर्थ



महाराष्ट्र राज्य
साहित्य संस्कृती
मंडळाच्या
अनुदानाने
प्रकाशित



वितरक :
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी
मुंबई - ४०० ००४



## दशकपूर्तीच्या निमित्ताने

दशकपूर्तीचा आनंद आज आम्हास
होत आहे.
कारण ‘ ऋतुवेगळे प्रहर ’ हे
आमचे दहावे प्रकाशन आहे.

२३ ऑगस्ट १९७७
‘ वसुधा ’चा जन्मदिवस.
७७ ते ८१ या अवधीत
दहा पुस्तके आम्ही प्रकाशित केलीत.
आणि वाचकांनीही या आमच्या
प्रयत्नास भरघोस साथ दिली.

वसुधा प्रकाशनच्या माध्यमातून
दर्जेदार, रसरशीत साहित्य
व तेही माफक दरात
वाचकांसमोर ठेवावे
ही आमची प्रांजळ इच्छा.

नव्या जुन्याच्या वादात
आम्हास रस नाही.
प्रथितयश, नवोदित
असा भेद आमच्याजवळ नाही.
आम्हाला पाहिजे
ताजे, टवटवीत देखणे साहित्य
मग ते कोणाकडूनही येवो...

अशा साहित्याचा
अखंड झरा
वसुधा प्रकाशनच्या
यशस्वी वाटचालीकरिता
त्याकडे सतत वाहत राहो
हीच सरस्वतीच्या भक्तांजवळ
नम्र प्रार्थना.

**—वसंत लुले**
प्रकाशक



## ‘ प्रहरां ’चे वेगळेपण

झपाटून लिहिल्यासारखे हे लिखाण मी लिहिले. लेखनाचा हा थोडा वेगळा प्रकार आहे. या कथा नाहीत. कथेसारखा परिणाम या लिखाणाने साधला नाही. एक परिणाम मात्र निश्चित साधला. प्रत्येक तुकडा वाचून झाल्यावर सुन्नपणा आणि अस्वस्थता यांचा एकत्र प्रत्यय वाचकांना आला. एक भावावस्था उलगडत गेल्यासारखी एकेका ‘ प्रहरा ’ची मांडणी आहे. काही ठिकाणी काव्यात्मकता आहे. तोसुद्धा भावावस्थेचाच एक भाग. काही ठिकाणी घटनांमधून भावनेचा धागा ओवण्याचा प्रयत्न आहे. घटना-प्रधानता असूनही परिणाम काव्यात्मकच असतो. काही चोखंदळ रसिकांचे मत असे पडले की, संपूर्ण ‘ प्रहर ’ वाचून झाल्यावर कादंबरीच्या आस्वादनाचा व्यापक प्रत्यय येतो.

यातले मला स्वत:ला नेमके काय अभिप्रेत होते ? काहीच सांगता येत नाही. मी मुद्दामच या लिखाणाला ‘ ऋतुवेगळे प्रहर ’ असे नाव दिले. खरे हे ऋतुनिरपेक्ष प्रहर आहेत. ऋतू असोत अगर नसोत, प्रहरांना त्यांचे स्वत:चे असे प्रहरपण असावे, हे सांगण्याची ही एक शैली. ऋतुसापेक्ष प्रहरांना नाही म्हटले तरी, एक ठराविकपणा येणार. ऋतु-निरपेक्ष प्रहरांना अशी कुठलीच चाकोरी नाही. जीवनात असे काही घडताना प्रत्यक्षात दिसत नाही, परंतु असे घडू मात्र शकते, हा वाचकांच्या मनाचा कौल पडावा असा या ‘ प्रहरां ’चा एकूण स्वभाव.

यातील पात्रे, घटना आणि स्थळे आयुष्याला अगदी स्पर्शून गेलीच नाहीत, असे नाही. मात्र, हे सारे येथे ज्या रूपात प्रकटले आहे ते रूप मला स्वत:लाही अनोखे आहे. एका ओघात हे सारे येतात–येऊन ठसतात–अन् मग वाटायला लागते की, यांच्याशी नाते सांगणारे आयुष्यात काही तरी येऊन गेले आहे. माझ्या आयुष्याशी हे ‘ प्रहर ’ अदृश्य पण पक्क्या धाग्याने जोडले गेले आहेत, हे त्रिवार सत्य आहे.

माझे मित्र व सहकारी श्री. वामन तेलंग यांनी मला अशा प्रकारच्या या लेखनास प्रवृत्त केले. त्यांनी माझ्याकडून लिहवून घेतले नसते, तर माझे हे पहिलेवहिले पुस्तक निघण्याचा योगच आला नसता. मी त्यांचा आभारी आहे.

माझ्या व्यावसायिक जीवनाचे संकेत सांभाळून हे लिखाण करणे ही अत्यंत अवघड अशी तारेवरची कसरत होती. माझी पत्नी सौ. नलिनी हिच्या सहकार्यामुळे मला ती सहज करता आली. तिचे आभार मी कोणत्या शब्दात मानू ?

याहून जास्त काही मला सांगायचं नाही.

**–ना. बा. ठेंगडी**



**प्रहरक्रम**

१. डोळे, पावलं अन् गुरुवर्य / एक
२. अश्वत्थामा / चार
३. मैथिली / सहा
४. गौतमीचा क्षण / दहा
५. सिस्टरचा क्रूस / तेरा
६. शाप / सतरा
७. श्रीमंत / एकवीस
८. नातं / चोवीस
९. भूक / अठ्ठावीस
१०. प्राणहिता / एकतीस
११. सैनिकाचं गाणं / चौतीस
१२. स्वप्नात येणारा वेदव्रत / सदतीस
१३. फिकट ऊन भुरकट सावल्या / चाळीस
१४. संध्याकाळची गोष्ट / त्रेचाळीस
१५. स्वामीजी, दिवा अन् काळा पुरुष / सत्तेचाळीस
१६. केस वाळवणारी मुलगी / एक्कावन
१७. पहिली मूठ जोंधळ्याची / चौपन
१८. तो / अठ्ठावन
१९. पद्मिनी / बासष्ट
२०. वाटाडया / सहासष्ट
२१. आज्ञा / सत्तर
२२. ओढ / पंचाहत्तर
२३. एकाकी / एकोणऐंशी
२४. माझ्या प्राजक्तीची सकाळ / त्र्यांशी
२५. अधिपती / शहांशी



या प्रहरांच्या कडांचे धूसरपण
पापण्यांच्या पैजेवर जपणाऱ्या
सायंकालीन आकाशास



# ऋतुवेगळे प्रहर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९३८
दा. क्र. २३५८५
निबंध फाटक
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## १ : डोळे, पावलं अन् गुरुवर्य

जुळवून लिहिणं कधी जमलं नाही.

जसं जुळवून बोलणं जमलं नाही.

लिहिण्याची थोडी तालीम झाली अन् एक दिवस अचानक गुरुवर्यांच्या गावी जाण्याचा प्रसंग आला.

गुरुवर्यांपुढं नम्रपणे उभा राहिलो.

ते अंथरुणाला खिळून होते.

माझ्यासाठी कसेबसे उठून बसले.

एरवीच फार बोलायचे नाहीत.

आता तर फार अशक्त झाले होते.

म्हणाले, " तू लिहिलेलं वाचतो. खूप पल्ला गाठायचा आहे–"

मी लीनपणे खाली मान घालून त्यांच्यासमोर उभाच होतो.

त्या तेवढ्याशा बोलण्यानंही त्यांना धाप लागली.

माझ्या नजरेला आपल्या नजरेतील आशीर्वादाचा आधार देत ते म्हणाले, " दासबोध वाच. चांगला लिहायला लागशील."

मला बोलायचं होतं निरामयीबद्दल.

निरामयी अचानक जीवनात आली, हे सांगायचं होतं.

निरामयीची गंमत होती.

तशी ती जीवनांत आलीच नव्हती.

तिची फक्त संवेदना माझ्या अस्तित्वाला व्यापत चालली होती.

तिचं हे व्यापत जाणं थांबलं पाहिजे म्हणून मी गुरुवर्यांना परोपरीनं विनवणार होतो.

तिनं माझ्या आयुष्यातून निघून गेलं पाहिजे, असा हट्ट मी धरणार होतो.

पण मला ते जमलं नाही.

त्यांच्या पाया पडलो अन् निघालो.

पण मी निरामयीच्या अन् माझ्या संबंधांचं वर्णन तरी गुरुवर्यांजवळ काय केलं असतं ?

तिच्याशी मी बोललोसुद्धा नव्हतो.

पत्र लिहिण्याचा प्रयत्न केला होता, पण ते जमलं नव्हतं.

ती सरळ सरळ आयुष्यात आली असती, तर सहजपणे तिच्यावरोबर जगलो असतो.

पण ती फक्त एक संवेदना बनून माझ्या रक्तातून वहात होती.

माझ्या त्वचेचं कवच फोडून ती सरळ रक्तापर्यंत पोचली होती.

आपलं रक्त आपलं राहिलं नाही, ही एक मनस्वी चीड.

मला अजूनही असं वाटतं की, निरामयी जिथं कुठं असेल, तिथं ती फक्त एक संवेदनाच असेल.

तिचे डोळे खूप करुण होते.

पण तिथली करुणा कुणाचसाठी नव्हती.

हे विचित्रच.

म्हणजे डोळे स्पष्टस्पष्ट निष्ठुर, निर्दय, निर्मम असणं एका परीनं सहन होण्यासारखं आहे, पण डोळ्यात करुणा असूनही ती कुणाचसाठी नसणं हे जन्म-ठेपेच्या शिक्षेसारखं आहे.

देहानं असूनही गुप्त झाल्यासारखी निरामयी.

पाऊस पडून गेला होता अन् रस्त्यात साडीचा खालचा घेर भिजेल, एवढं पाणी होतं.

निरामयीनं चालता चालता साडी आवरून धरली अन् वाहत्या पाण्यात सारखे-सारखे भिजून नितळ-स्वच्छ झालेले तिचे तांबुस-गोरे पाय मला दिसले.

चपलेचे काळेशार पट्टे भिजून आणखीच काळे झाले होते अन् हिच्या नितळ-स्वच्छ, तांबुस-गोऱ्या पावलांवर त्याची रेखीव कलाकुसर बनली होती.

तिची पावलं मला कुठंही मुक्काम नसलेल्या पावलांसारखी वाटली.

कुणासाठीच नसलेली डोळ्यातली करुणा अन् कुठेच मुक्काम नसलेली पावलं !

गुरुवर्यांची आठवण हृदयात दाटून आली.

पण प्रत्यक्ष भेटीत गुरुवर्यांजवळ विषय काढू शकलो नाही.

एक दिवस कळलं की, गुरुवर्य वारले !

फार वाईट वाटलं.

दासबोध वाचायला सुरुवात केली.

वाचत सुटलो.

पुन:पुन्हा वाचत गेलो.

अन् एक दिवस निरामयींची ती संवेदना खूप तीव्र झाली.

माझ्या लिहिण्याला वेग आला.

वणंवणं लिहीत सुटलो.

निरामयींच्या डोळ्यातली करुणा कुणासाठी ?

निरामयींच्या पावलांचा मुक्काम शेवटी कोणता ?

माझ्या लिहिण्याला या प्रश्नांची धार आहे.

अन् मी लिहीत सुटलो आहे.

या प्रश्नांची उत्तरं जिथं मला सापडतील, तिथं गुरुवर्य मला भेटतील, याची मला खात्री आहे.

तोपर्यंत हे असंच लिहीत जाणं आहे.

मात्र एक गोष्ट आहे.

मला जुळवून लिहिणं कधी जमलं नाही.

जसं जुळवून बोलणं जमलं नाही.

## २ : अश्वत्थामा

माझ्या अपरात्रीला दारावरच्या थापांचं तोरण लागलेलं आहे.

मी लहान असतांनापासून.

अपरात्री घराच्या मुख्य दारावर थाप पडायची.

वडील एकदम झोपेतून उठायचे.

म्हणायचे, " दादा आले ! "

मग आई उठायची, नंतर आम्ही मुलं. वडील हळूच दाराची कडी काढायचे. हळूच दार उघडायचे. दबक्या स्वरात " या " म्हणायचे.

ते गृहस्थ आत यायचे. घरातल्या दोन झोपण्याच्या खोल्यांमध्ये जे मिणमिणते दिवे असायचे, त्यांचाच तेवढा प्रकाश त्या हालचालींना असायचा.

चुकूनसुद्धा एकदम मोठा दिवा लावला जायचा नाही.

या अपरात्रीच्या थापेची नकळत एक शिस्त होऊन गेली होती.

ती अशी की, ही थाप पहिल्यांदा कोणीही ऐकलेली असो; त्यानं एकदम उठून दरवाजा उघडायचा नाही.

वडील उठतील आणि तेच दरवाजा उघडतील. तो जणू वडिलांचा मान.

ते गृहस्थ आत आले की, वडील हळूच मुख्य दार लावून घ्यायचे. मग हळूच कडी घालायचे आणि घाईघाईनं त्या गृहस्थांच्या मागं जायचे. आम्ही सारेच जायचो.

घरात, घराच्या अगदी मधोमध म्हणता येईल, अशी एक खोली होती.

या खोलीत जे काही घडायचं त्याचा बाहेरच्या जगाला मागमूसही लागू नये, इतकी ती आत होती. म्हणूनच, त्या गृहस्थांचं असं येणं कित्येक वर्षं चाललं; पण घरातले लोक सोडून इतर कुणाला त्यांच्या येण्याचा मुळीसुद्धा पत्ता लागला नाही.

मोठ्या प्रकाशाचा दिवा लावला जायचा तो फक्त त्याच खोलीत.

या दिव्याचा प्रकाश झगझगीत असायचा.

हा दिवा लावण्याचा मानही वडिलांचाच.

त्यांनी तो दिवा लावला की, अंगणातल्या पावसात उतरल्यासारखे आम्ही सारे त्या खोलीत शिरायचो.

ज्या दरवाजानं आम्ही आत शिरायचो तो दरवाजा वडीलच आतून लावून घ्यायचे. वास्तविक हा दरवाजा मुख्य दरवाजाइतका हळू लावण्याचं कारण नव्हतं. पण वडील हाही दरवाजा लावताना आवाज होणार नाही याची काळजी घ्यायचे.

या खोलीत सर्वांच्या बसण्याची व्यवस्था असायची. एका मोठ्या टेबला-भोवती घरातल्या प्रत्येकाला एकेक येईल, एवढ्या खुर्च्या असायच्या.

टेबलाच्या अरुंद भागाला दोनच खुर्च्या. एकीवर ते गृहस्थ म्हणजे दादा बसायचे. दुसरीवर वडील.

वडील हळूच विचारायचे, " काही घेणार ?"

भूक लागली असेल तर दादा जेवायला मागायचे. नाहीतर चहा किंवा कधी नुसतं पाणी.

वडील, आई आणि दादा यांच्यात मग अगदी हलक्या आवाजात गोष्टी व्हायच्या.

मला त्या गोष्टींमधलं काहीच कळायचं नाही.

दादा मधूनच आम्हा मुलांपैकी कुणाची तरी विचारपूस करायचे. ज्याची करायचे त्याला धन्य धन्य वाटायचं.

अशाच काही वेळ हलक्या आवाजात कुजबुजत गोष्टी झाल्या की, दादा जायला उठायचे.

वडील विचारायचे, " आता पुन्हा केव्हा येणार ?"

कधीकधी वडिलांना गहिवरून यायचं.

आईलाही यायचं.

दादा वडिलांच्या खांद्यावर थोपटायचे. म्हणायचे, " येईन असाच फिरत फिरत. लवकरच."

आणि पहाट होण्यापूर्वीच दादा घरातून झटक्यात बाहेर निघून जायचे.

त्यांच्या जाणाऱ्या आकृतीकडे पहात वडील बराच वेळ दरवाजात उभे राहायचे.

पहाटेआधीच्या अंधारात दादा फार थोडा वेळ नजरेच्या विणीत असायचे. सुळकन् मासा पाण्यात निसटावा, तसे ते अंधारात निसटायचे.

दादा कुठून यायचे आणि कुठं जायचे ते कधीच कुणाला कळलं नाही. वडिलांनाही नाही.

त्यांनी कधी चौकशीही केली नाही. ते, अपरात्री का होईना, थोड्या वेळा-साठी तरी येऊन भेटतात, यातच वडिलांचं समाधान होतं.

दादा वडिलांचे वडील होते. म्हणजे माझे आजोबा.

दादा असे अवेळी कां येतात आणि अवेळीच कां जातात ते मला चौकशी न करताही कळलं होतं. घराच्या भिंतींनीच सांगितल्यासारखं.

असल्या गोष्टी जेव्हा आपल्याला कळतात तेव्हा त्या नेमक्या कशा कळल्या ते जन्मभर आठवूनही सापडत नाही.

अमुक एकानं सांगितलं म्हणून कुणाकडे बोट दाखविता येत नाही.

मला कळलं होतं की, दादांवर खुनाचा आरोप आहे. खुनाच्या एका प्रक-रणात दादांना गोवण्यात आलेलं आहे. त्याच्याशी त्यांचा संबंध नसतानासुद्धा. ते पूर्ण निर्दोष असतानासुद्धा !

आपण गोवले जाणार हे लक्षात येताच दादा फरार झाले होते. फरार-पणातच ते एखाद्या अपरात्री आमच्या घरी यायचे अन् पहाटेपूर्वी निघून जायचे.

हे असं कित्येक वर्षं घडलं.

अन् एका पहाटेआधी दादा जे काळोखात निघून गेले ते पुन्हा आलेच नाहीत.

त्यानंतर वर्षानुवर्षं आम्हीं वाट पाहिली.

दादा आले नाहीत.

त्यांचं काय झालं, तेही कळलं नाही.

पण कित्येक वर्षं अपरात्री दारावर पडत राहिलेल्या त्या थापांनी माझा सारा जन्म व्यापून टाकला आहे.

खुनाच्या आरोपाची जखम डोक्यावर बाळगत सतत हिंडत राहिलेला हा अश्वत्थामा दोन घटकांच्या निवाऱ्याचं तेल मागायला कोणत्याही अपरात्री दाराशी येऊन उभा राहील, असं मला सारखं वाटत असतं.

● ●

## ३ : मैथिली

अनुभवांचे भार सहन होईनासे झाले आहेत.

म्हणूनच वाटतं की, गुलाबाच्या पूर्ण फुललेल्या फुलांची गच्च ओंजळ घेऊन उभं असल्यासारखं आयुष्य एकाग्र व्हावं.

अनुष्टुभनं जाता जाता माझी ओंजळ भरली.

गुलाबाचं रान तुडवीत तो हिंडला अन् टपोरी-टपोरी फुलं आणून त्यानं माझ्या ओंजळीत टाकली.

अंग अंग शहारून टाकणाऱ्या त्या क्षणानं माझ्या तळहातांची पौर्णिमा बनवून टाकली.

पौर्णिमा एकाग्र असते.

मैथिलीच्या बोलण्यासारखी.

मैथिली बोलत असते तेव्हा ती ऐकत असल्यासारखी एकाग्र वाटते.

आपण वास्तविक ऐकत असतो.

पण आपणच बोलत आहोत, असं वाटतं.

म्हणजे ती स्वत:ही एकाग्र असते अन् ऐकणाराही एकाग्र असतो.

पण या एकाग्रतेत तिला आपले केस विसकटल्याचं भान मध्येच कसं येतं कोण जाणे.

कधी उजव्या हाताच्या बोटांनी केसांची डावीकडची बाजू नीट रेखून घेते, तर कधी डाव्या हाताच्या बोटांनी उजवीकडची बाजू नीट रेखून घेते.

हे ती घाईत करते पण भावुक डोळ्यांमध्ये काजळ रेखावं इतक्या अलगद-पणानं करते.

खरं म्हणजे तिचे केस विसकटलेले नसतातच मुळी.

तिला उगीचच तसं वाटतं.

अन् गंमत अशी की पाहणाराला असं वाटतं, तिचे केस खरोखरीच विस-कटलेले होते—तिनं ठाकठीक केले, हे चांगलं झालं !

बोलण्यात एकाग्र असतानाच ती ही हालचाल करून घेते अन् आपणही एकाग्र असतानाच ती पाहून घेतो.

मैथिली बोलताना, पौर्णिमेइतकी एकाग्र असते, असं जेव्हा मी अनुष्टुभला सांगितलं तेव्हा तो हसला.

त्यानं विचारलं, " पौर्णिमा कधी एकाग्र असते का ?"

आता मला त्याचं हसू आलं.

फक्त एकदाच प्रवासात भेटून गेलेल्या त्या अनोळख्या पोरीनं जर मला विचारलं असतं की, " प्रवासातली अगदी थोडचा वेळाची भेट जन्मभरासाठी लक्षात राहते का ?" तर जसा मी हसलो असतो, तसा अनुष्टुभच्या या प्रश्नाला हसलो.

पौर्णिमेचं एकाग्रपण अनुष्टुभनंच तर मला जाणवून दिलं होतं.

गाव संपला रे संपला की लगेच शेतं लागायची.

गावातून येऊन गावाबाहेर निघून जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या दोन्हीही बाजूंना शेतं.

पण ज्या ऋतूत मी अन् अनुष्टुभ रात्री त्या रस्त्यानं फिरायला जायचो, त्या ऋतूत शेतांच्या जागी नुसती दूरवर जमीनच जमीन असायची.

एवढचा विस्तीर्ण जमिनीवर फक्त एकच विहीर अशी की, जी रस्त्या-वरून सहज दिसायची.

विहीर मोठी अन् तिला रुंद पाळ.

विहिरीपासून दहा पावलांवर एका अवलियाचं थडगं.

थडग्याला पांढरीशुभ्र सफेदी.

अनुष्टुभबरोबर फिरता फिरता एकदा पौर्णिमा आली.

पौर्णिमेच्या लख्ख प्रकाशात अवलियाचं ते पांढरं शुभ्र थडगं पेटत्या मशालीसमोर उभ्या असलेल्या फकीराच्या गोऱ्या कपाळासारखं वाटायचं.

आणखीही एक वाटायचं.

वाटायचं की, आत्ता या क्षणी साऱ्या चराचरावर या अवलियाची हुकमत प्रस्थापित झालेली आहे.

त्या तशा पौर्णिमेच्या रात्री चालता चालता आम्ही उजवीकडच्या शेता-

तल्या विहिरीकडे वळलो होतो.

विहिरीत पाय सोडून तिच्या पाळीवर बसलो होतो.

थडग्याकडे तोंड करून.

अन् अनुष्टुभ भारावल्यासारखा एका पाठोपाठ एक अशी तलत महमूदची गाणी नुसता म्हणत सुटला होता.

सारं आयुष्य एका ॐकारात साठवल्यासारखी एकाग्रता.

तेव्हापासून माझ्यासाठी पौर्णिमा विलक्षण एकाग्र बनली.

अन् गंमत अशी की, स्वत: अनुष्टुभला त्याची कल्पनाही नाही.

मैथिलीला तरी कल्पना असेल का की ती खूप एकाग्र बोलते ?

कोण जाणे !

अनुष्टुभनं जाता जाता माझी ओंजळ गुलाबाच्या पूर्ण फुललेल्या फुलांनी गच्च भरून दिली.

जाता जाता म्हणजे मी जाता जाता.

दोन दिवसांसाठी त्याच्या गावी त्याच्या घरी रहायला म्हणून गेलो, अन् परततांना त्यानं हा अनुभव दिला.

अन् मग एकाएकी इतर अनुभवांचे भार सहन होईनासे झाले.

गुलाबाच्या फुलांनी ओंजळ भरण्याचा अनुभव यायला नको होता.

आता आयुष्य कसं उदासवाणं वाटायला लागलं.

सारे अनुभव घेऊनही खऱ्याखुऱ्या अनुभवाला वंचित झाल्यासारखं वाटायला लागलं.

पौर्णिमा, अवलियाचं थडगं, तलत महमूदचं गाणं हे सारं मिळून एक आक्रोश बनून गेलं.

हा आक्रोश साऱ्या रक्तातून धावायला लागला आहे.

एकाग्रतेसाठी मन सैरभैर झालं आहे.

मैथिलीच्या बोलण्याला एक वेगळा अर्थ मिळत चालला आहे.

मन मैथिलीकडे विलक्षण आवेगानं झेपावत चाललं आहे.

## ४ : गौतमीचा क्षण

खूप पाऊस पडला. खूपच. पडला पाचच मिनिटं, पण पाच दिवस सतत पडत होता, असं वाटलं.

अशा घनघोर पडणाऱ्या पावसाशी तादात्म्य पावण्याचा अनुभव हा एक अद्वितीय अनुभव असतो.

तुम्ही काळाच्या उदरात फार खोलवर बुडी मारता अन् बुडी मारून जिथं पोचता तिथं सृष्टीच्या जन्माची प्रक्रिया घडत असते.

तुमच्या व्यक्तिमत्त्वाला आतून नवी पालवी फुटत असते.

हा अनुभव असा विश्वव्यापी असतो की, पाच मिनिटांचा पाऊस तुम्हाला पाच दिवसांच्या पावसासारखा वाटतो.

असा पाऊस एकदम उघडावा अन् एकदम सारं मोकळंमोकळं होऊन जावं.

ही वेळ दुपारची असावी.

अशा वेळी ऊन नको पण प्रकाश हवा.

म्हणजे आकाशात परस्पर पडलेल्या उन्हाचं पृथ्वीवर फक्त प्रकाशाच्या रूपानं प्रतिबिंब पडावं.

हा प्रकाश प्रेयसीच्या प्रसन्न निर्मळ हसण्यासारखा असतो.

दुपारी रपरपून कोसळणारा पाऊस एकदम थांबल्यानंतरचा, मोकळ्या वातावरणाचा अन् काठोकाठ प्रकाशाचा क्षण गौतमीचा असतो.

माझ्या घरापासून गौतमीच्या घरापर्यंत जाणाऱ्या रस्त्याचं एक वैशिष्टच असं आहे की, कितीही पाऊस पडला तरी या रस्त्यावर पाणी उरत नाही.

गौतमीच्या क्षणी या रस्त्यावरून चालतांना जन्मान्तराची वाटचाल करीत असल्यासारखं वाटतं.

ही वाटचाल पूर्ण झाली की, गौतमीचं घर येतं. गौतमीच्या लहानशा घराचं लहानसं अंगण उंच भिंतींनी बंदिस्त केलेलं आहे.

अंगणाला संरक्षण देण्याची ही विचित्रच पद्धत.

पण अंगणाभोवतीच्या या भिंतींमुळेच मला गौतमी किल्ल्यात राहणाऱ्या राजकन्येसारखी वाटते.

एक छोटंसं ठेंगणं फाटक.

फाटकालाच भिडलेली अन् त्याच्याशी सरळ काटकोन करणारी एक भिंत.

या भिंतीशी काटकोन करणारी दुसरी भिंत.

याही भिंतीशी काटकोन करणारी तिसरी भिंत.

अन् तिसऱ्या भिंतीशी काटकोन करून थेट फाटकापर्यंत आलेलं गौतमीचं घर.

तीन दिशांच्या तीन भिंती अन् चौथ्या दिशेचं घर मिळून अंगणाची बंदिस्ती.

अंगणाच्या अन् घराच्या भिंतींचा रंग पांढरा.

तिसऱ्या अरुंद भिंतीच्या भागाला एक लहानसा हौद आहे.

हौदाला लहानसंच कारंजं आहे.

अन् हौदाच्या बाजूला स्वस्तिकाचं अंगणाच्या मानानं मोठंसंच एक झाड आहे.

झाडाची एखादी फांदी हौदाच्या पाळीवर झुकते अन् कारंजातून उडणाऱ्या पाण्याची मधूनच एखादी हलकीशी शिंपण त्या फांदीवर होऊन जाते.

स्वस्तिकाच्या झाडाची पांढरी फुलं घर–अंगणाच्या भिंतींच्या रंगाशी संगती राखतात.

गच्च पावसानंतरच्या क्षणी मी गौतमीच्या घरी जायला निघतो.

तिच्या अंगणात दाखल होतो.

पांढरी शुभ्र साडी नेसलेली गौतमी हौदाकडे पाठ करून हौदाला टेकून उभी असते.

घर–अंगणाच्या भिंती, स्वस्तिकाची फुलं अन् गौतमीची साडी या साऱ्यांचा मिळून एक सार्वभौम पांढरा ठसा मनात उमटतो.

मन भरून माझं स्वागत करताना ती मोकळी शुभ्र हसते.

दुपारच्या मुसळधार पावसानंतर एकदम मोकळ्या झालेल्या वातावरणाचा अन् देवदूताच्या स्मितासारख्या प्रकाशाचा क्षण गौतमीचा होऊन किती काळ झाला ?

काळाचा हिशेब करीत बसलो तर या क्षणाचं सौंदर्य निघून जाईल.

केव्हा तरी एकदा दुपारी खूप पाऊस पडला होता. मी पावसाशी तादात्म्य पावलो होतो. काळाच्या उदरात फार खोलवर बुडी मारली होती. बुडी मारून जिथं पोचलो होतो तिथं सृष्टीच्या जन्माची प्रक्रिया घडत होती.

पाऊस थांबताक्षणीच पुनर्जन्म झाल्यासारखा मी बदलून गेलो होतो.

असले अनुभव शेषाद्रींना सांगायचे असतात.

शेषाद्रींच्या घरी तडक गेलो.

फाटकातून आत शिरलो अन् अंगणात आलो.

अंगणातल्या हौदाकडे पाठ करून हौदाला टेकून गौतमी उभी होती.

पांढरीशुभ्र साडी नेसलेली.

मला पाहून ती मोकळीशुभ्र हसली.

तिनं विचारलं, " कोण हवंय् आपल्याला ?"

" शेषाद्री आहेत ?" असं मी विचारलं अन् शेषाद्री घरातून बाहेर आले. हसत हसत माझ्याकडे येत म्हणाले, " ये...ये. तू हिला ओळखलं नसशील. ही माझी मुलगी गौतमी. गेली काही वर्षं दिल्लीला होती. कालच आली. आता इथेच राहणार आहे."

शेषाद्री बराच वेळ बोलत होते. माझं त्यांच्या पुढच्या बोलण्याकडे लक्ष नव्हतं.

लहानसा हौद, लहानसंच कारंजं अन् फुलांनी लदबदलेलं मोठंसं स्वस्तिकाचं झाड हे दृश्य आपल्या पाठीशी घेऊन उभ्या असलेल्या गौतमीकडं मी एकटक पाहात होतो.

मला आत्ताच येऊन गेलेल्या अनुभवाची नकळत तिच्याशी सांगड घालत होतो.

माझ्या पुनर्जन्माचा क्षण मी तिच्या स्वाधीन केला.

पुढे शेषाद्री वारले. अन् गौतमी आपल्या विधवा आईबरोबर त्याच घरात राहू लागली.

—एकदा गौतमीचा बनलेला तो क्षण कायमचा तिचा होऊन बसला.

● ●

## ५ : सिस्टरचा क्रूस

बाहेर भुरभुरणारा पाऊस अन् शिवाय ऊन.

भुरभुरणाऱ्या पावसातलं ऊन ऊन वाटत नाही.

सुरांना अत्तराचा साज चढावा तसं हे मिश्रण असतं.

हा प्रकार प्रत्यक्ष डोळ्यासमोर घडत असला तरी तो भासासारखा वाटतो.

आपण आपल्याला कितीही पटवून दिलं तरी भास नाही हे मानायला आपलं मन तयार नसतं.

सकाळच्या धुक्यातलं झाड तसंच.

हे झाड प्रत्यक्ष आहे, हे पटत नाही.

गंमत अशी की, एखादवेळी धुकं खरं वाटतं, पण झाड खरं वाटत नाही.

वास्तवाचं भासपण हे इतकं वास्तव असतं.

तांबुसगोऱ्या गोल अन् गोड चेहऱ्याची ती सिस्टर कधी वास्तव वाटलीच नाही.

तिचा चेहरा गोड होता पण म्हणून हवेत विरून जावा असा नव्हता.

गोड चेहरा आपल्या डोळ्यादेखत तरल बनतो अन् त्याची पहिली पापणी झुकताच हवेत विरून जातो.

अशा गोड चेहऱ्याच्या बाबतीत आणखी एक गोष्ट कुणाच्या लक्षात आली आहे का ?

हा चेहरा आपल्या अगदी समोरासमोर असतो अन् तरीही तो आपल्याला

आठवत राहतो.

या चेहऱ्याची एक शैली असते.

तो आपल्याला खूप आधार देतो अन् खूपच निराधार बनवून टाकतो.

अरे, हे तर भरकटणं झालं.

मूळ विषय असा की, सिस्टरचा चेहरा गोड असला तरी तो हवेत विरणारा नाही.

त्याचा गोडवा ठसठशीत आहे.

हवेचे सारे हल्ले परतवून लावून तो सिस्टरचा चेहरा म्हणून कायम राहतो.

पांढऱ्याशुभ्र पायघोळ झग्यातली सिस्टर खुणेच्या पानावर उघडून ठेवलेल्या बायबलसारखी वाटते.

प्रत्यक्ष ख्रिस्त आजारी असल्याच्या लगबगीनं ती हॉस्पिटलच्या मोठ्या फाटकातून सकाळी सकाळी आत शिरते, तेव्हा माझ्या गच्चीतून एखाद्या भासासारखी दिसते.

एकदा भुरभुरणारा पाऊस होता अन् शिवाय ऊनही होतं.

मी गच्चीला लागून असलेल्या खोलीच्या खिडकीतून हॉस्पिटलकडे पाहिलं, तेव्हा सिस्टर लगबगीनं हॉस्पिटलच्या एका इमारतीकडून दुसऱ्या इमारतीकडे मधल्या रस्त्यानं चालली होती.

सिस्टर भास बनली ती तेव्हाच तर नाही ना ? की एकदा सकाळच्या धुक्यात हॉस्पिटलच्या आवारातच दिसली होती तेव्हा ?

सिस्टरचं दुरूनचं हे असं दिसणं कसं असतं ?

बाळात मन राहून गेलेल्या मृत मातेच्या भटकत्या आत्म्यानं त्या बाळाचं अंगाई गीत गावं तसं !

सिस्टरचा अन् माझा एक करार होता.

माझ्या घरापासून हॉस्पिटलकडे जाणारा रस्ता जिथं वळण घेतो तिथं सिस्टरनं मला भेटायचं.

अन् मी पुढं केलेल्या ओंजळीत एक क्रूस टाकायचा.

असे कितीतरी क्रूस माझ्या ओंजळीत पडले.

क्रूस टाकताना सिस्टर छान हसायची.

क्रूस ओंजळीत पडला की खूप अंतर्मुखता यायची.

सिस्टर एरवी दुसरीकडे कुठं भेटली तर बोलायची.

माफकच.

पण संपूर्ण आयुष्यानिशी बोलायची.

त्यामुळे फार बोलून गेली आहे, असं वाटायचं.

म्हणजे अजूनही तसंच वाटतं.

सांगण्याचा मुद्दा असा की, एरवीच्या भेटीत बोलणारी सिस्टर क्रूस ओंजळीत टाकताना मात्र काहीच बोलायची नाही.

सिस्टर स्वत: त्यावेळी अंतर्मुख होत असेल का ?

असावी.

कारण क्रूस टाकून, छान हसून ती एकदम पाठ फिरवायची अन् सरळ हॉस्पिटलला जायची.

एकदाही मागं वळून न बघता.

मी हा भूतकाळ सांगत आहे.

सिस्टर तशी अजूनही आहे.

अजूनही गच्चीतून किंवा गच्चीला लागून असलेल्या खोलीच्या खिडकीतून दूर हॉस्पिटलच्या आवारात ती मला दिसते.

कुठं भेटलो की, अजूनही छान हसते अन् बोलतेही.

पण आता ती माझ्या ओंजळीत क्रूस टाकत नाही.

एक दिवस ती त्या वळणाशी आली.

मी माझी ओंजळ पुढं केली.

तिनं नकारात्मक मान हलवली.

मी चमकून तिच्याकडं पाहिलं.

ओंजळ तशीच राहिली.

मी विचारलं, "आज क्रूस आणला नाहीस ?"

ती नेहमीसारखेच छानपैकी हसली.

म्हणाली, "आता क्रूस देणं बंद."

मी ओंजळ सोडली.

कारण विचारलं नाही.

वाटलं, तिच्याजवळचे क्रूस संपले असतील.

"उद्या देणार ?" मी विचारलं.

"अं हं, आता कधीच नाही"–सिस्टर म्हणाली.

तरीही मला काही वाटलं नाही.

मी परत फिरलो.

सिस्टरनं थांबवलं.

म्हणाली, "तुला आतापर्यंत जेवढे क्रूस मी दिले, ते सगळेच्या सगळे मला परत कर."

हॉस्पिटलच्या उंच टोकावर उभ्या असलेल्या येशूच्या पुतळ्याभोवती एकदम कावळेच कावळे जमले, कर्कश 'काव ऽ काव ऽ' करीत खूप वेळ पुतळ्याभोवती फिरत राहिले अन् मग त्यांनी तो पुतळा पार झाकून टाकला–

कर्कश 'काव ऽ काव ऽ' सुरूच ठेवली– अशी तीव्र संवेदना माझ्या अस्तित्वभर पसरली.

मी "का ?" विचारण्याच्या आधीच सिस्टरनं भेदक नजरेनं माझ्याकडे पाहिलं.

काहीच बोललो नाही.

सिस्टरचे सारे क्रूस मी परत केले.

आता माझ्याजवळ एकही क्रूस नाही.

माझ्या कुठल्या पापासाठी सिस्टरनं मला ही शिक्षा दिली ?

हे सहज घडलं, असं मनाला खूप पटवून सांगितलं, पण मन मानीत नाही.

सिस्टरनं शिक्षा केली, असंच सारखं वाटतं.

या वाटण्यानं आता अस्तित्व व्यापून टाकलं आहे.

मी आतल्या आत कुरतडला जातो आहे.

आतून माझा नुसता आक्रांत सुरू आहे.

जवळ एकही क्रूस न उरलेला मी रोजच्या रोज क्रूसावर चढतो आहे.

सिस्टर, मला माझं पाप सांगशील का ?

## ६ : शाप

समीना.

गॅलरीत उभं राहिलं की, दृष्टीच्या घनदाट टप्प्यात, पण तरीही आधीचा जन्म काही केल्या आठवत नसल्यासारखी. आसपासचे लोक म्हणायचे, समीना सुंदर आहे.

म्हणजे नेमकी कशी आहे ?

ती त्या घरात अगदी साधेपणी आली.

सत्तारचं लग्न काही वाजतगाजत झालं नाही.

त्याच्या म्हाताऱ्या आईला घरकामासाठी मदत म्हणून सून हवी होती.

पण सत्तार घरात माणिक घेऊन आला.

सारेच म्हणायचे, सत्तारनं नशीब काढलं.

सत्तारला तसं वाटत होतं का ?

सत्तार जगण्याच्या संघर्षात इतर सारंच भान हरवून बसलेला. संघर्ष तीव्रच.

एखाद्या शापित घरासारखं घर हातातोंडावर चाललेलं.

सत्तारच्या बापानं आपलं उभं आयुष्य पिळून काढलं तेव्हा कुठं सत्तारच्या लग्नाची तजवीज झाली.

म्हणजे जी काही झाली तेवढीच !

घर संपूर्ण टिनाचं.

बसकं म्हणजे खूपच बसकं.

इतकं बसकं घर उभ्या आयुष्यात पाहिलं नाही.

टिनाच्या पत्र्यांनीच एकमेकींपासून अलग केलेल्या तीन खोल्या.

खोली म्हटली की, आपल्याला एक किमान काहीतरी वाटतं.

तसं काहीच या खोल्यांमध्ये नव्हतं.

फक्त आडवी माती अन् उभे टीन.

घरात सामानसुमान जेमतेम अन् तेही जुनाट, विरलेले.

इथं समीनाचं सौंदर्य नांदलं.

घर आतून ओसाड अन् बाहेरून उघडंबोडकं.

घराला मागची बाजू होती अन् ती विस्तीर्ण होती.

या जागेत भाजीपाला लावलेला.

घराच्या आतल्या पेक्षाही मागच्या उघड्यावर अधिक सुरक्षित वाटायचं.

घराच्या समोरच्या जागेत लोहारकामाची ऐरणी–भट्टी.

त्यात दोघंही बापलेक रात्रंदिवस तावून निघालेले.

समीना समोरून कधीच बाहेर आली नाही.

मागल्या बाजूला फक्त सकाळी आली.

कबुतरांना दाणे टाकायला.

नखशिखान्त बुरखा लेवून मागच्या अंगणात येणाऱ्या समीनाचे फक्त गोरे हात दिसायचे.

डाव्या हातात दाणे असलेली कटोरी अन् उजवा हात दाणे फेकत.

दाणे फेकतांना होणारी तिच्या हाताची हालचाल कबुतरांच्या फडफडण्या-सारखी असायची.

घरातून अंगणात येताना राज्यारोहणासाठी सिंहासनाकडे ताठ्यात अन् ठसक्यात निघालेल्या राणीसारखी असायची.

कबुतरांना दाणे टाकताना इतकी खोलवर समरसून जायची की, आतून सासूनं हाक मारीपर्यंत तशीच मागच्या अंगणात रहायची.

सासू हाक मारायची.

ही गोड गाण्यातून उचललेल्या एखाद्या लहानशा तानेसारखी सुरेल आवा-जात " आऽऽयीऽऽ " म्हणायची.

हाकेची उत्तरं आयुष्यात कितीतरी ऐकलीत.

पण या उत्तरासारखं उत्तर हेच.

दवबिंदूमध्ये देवाचं प्रतिबिंब दिसावं तसं.

मग समीना लाजून पळाल्यासारखी घरात पळत असे.

समीना सुंदर लाजतअसेल. सुंदर म्हणजे सुंदर.

यासारखी सुंदर अन् त्यासारखी सुंदर असं काही नाही.

अगदी पहाटे ताजुद्दीनच्या दर्ग्यातून एक बांग निघते.

तिचं आपल्या हृदयाच्या तळापर्यंत येऊन पोचणं किती तलम असतं.

या तलमपणाला यासारखं तलम अन् त्यासारखं तलम असं म्हणताच येणार नाही.

ते तलमपण त्याचंच.

तसं समीनाचं लाजणं असेल.

त्या शापित घरात सत्तारचा बाप ऐरणीवर घाव घालता–घालता पुरता थकला.

लोळागोळा होऊन पडला.

हात उचलणंसुद्धा अशक्य.

सत्तार हात उचलून घाव घालतच राहिला.

समोर सत्तारचा हात घाव घालण्यासाठी उंच उठत होता अन् मागं समीनाचा कबुतरांना दाणे फेकण्यासाठी.

हे असं अनेक वर्षं चालू राहिलं.

अन् मग एक दिवस सत्तारच्या लक्षात आलं की, कितीही घाव घातले तरी या घराचं नशीब उजळणार नाही.

घर शापित आहे.

त्यानं ठरवलं घर सोडून द्यायचं.

म्हातारा लुळापांगळा बाप, आई अन् पत्नी यांना घेऊन दुसरीकडे जायचं.

घरानं इतका इतका अंत पाहिला होता की, ते सोडून जाण्याचा उमाळा येणं शक्यच नव्हतं.

सामानाची बांधाबांध करायची म्हटलं तरी कोणत्या सामानाची ?

म्हणण्यासारखं सामानच नव्हतं. घर सोडण्याची तयारी लवकर आटोपली.

सकाळी रोजच्यासारखी समीना मागच्या अंगणात आली. कबुतरं जमलीत.

बुरख्याआड समीनाचा चेहरा खूप दुःखी झाला असेल.

समीना रोजच्यासारखीच दाणे फेकण्यात गढून गेली.

रोजच्यासारखीच सासूनं हाक मारली.

रोजच्यासारखीच समीना "आऽऽयीऽऽ" म्हणाली.

अन् रोजच्यासारखीच आत पळत गेली.

इथून रोजच्यापेक्षा वेगळं झालं.

सत्तारनं आपल्या लुळ्यापांगळ्या बापाला बाहेर आणलं अन् एका

हातगाडीत बसवलं–सामानाच्या बाजूला.

नंतर सत्तारची आई बाहेर आली.

तिघंही थोडा वेळ समीनाच्या बाहेर येण्याची वाट पहात बाहेर थांबले.

मग सत्तारच्या आईनं हाक मारली. समीना आतून "आऽऽयीऽऽ म्हणाली.

अन् घराच्या समोरच्या दारानं समीनाचं पाऊल पहिल्यांदा बाहेर पडलं.

● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९३८
दा. क. २३५८५
निबंध पाठा०२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# ७ : श्रीमंत

देवींचा डोळा नुकताच लागला होता.

मी जिना चढून वर गेलो तेव्हा सर्वात वरच्या पायरीवर देवींची सेविका भटली.

म्हणाली, " देवींचा नुकताच डोळा लागलाय्. चार दिवसरात्री टक्क जाग्या होत्या."

अलिकडे हे असं फार व्हायचं.

देवींना झोप येईनाशी झाली होती.

कधी एखाद वेळी आजच्यासारखी झोप आलीच तर जवळपास श्वासांचा-सुद्धा आवाज होणार नाही, याची सेविका काळजी घ्यायच्या.

जिना पूर्ण चढून उजवीकडे वळलो.

थोडं अंतर चालून गेलं की, देवींची खोली.

उघडया खिडकीतूनच देवींना बघितलं.

त्यांच्या श्रीमंत-गोऱ्या चेहऱ्यावर शांत-सात्विक भाव होते.

त्यांच्या मिटलेल्या डोळयांमध्ये असंख्य विस्तीर्ण नद्यांची पात्रं एकवटली होती.

डोक्यावरचे केस काही काळे, काही पांढरे.

मागे एकदा भेटलो, तेव्हा पांढऱ्या केसांचं प्रमाण इतकं नव्हतं.

पण देवींच्या चेहऱ्यावरील तेजाला पांढऱ्या केसांची तमा नव्हती. त्या तेजामुळेच त्या पांढऱ्या केसांना रुपेरी भास व्हायचे.

पांढरीशुभ्र चादर असलेल्या अंथरुणावर पांढरीशुभ्रच शाल गळचा-पर्यंत ओढून घेऊन देवी अलगद पहुडल्या होत्या.

त्या तशा झोपलेल्या स्थितीतही डोक्यावरून पांढरा पदर होता.

चर्चमधील सामूहिक प्रार्थनेच्या एकलयी सुरांसारख्या मला देवी वाटल्या.

ज्यांना नुसतं बघितलं तरी तृप्तीची लाट साऱ्या शरीरभर आंदोळून जावी, अशा देवी !

खोलीभर पसरलेल्या सकाळच्या उजेडात देवी जन्मण्याइतक्या ताज्या वाटल्या.

मी परत फिरलो.

परत जिन्याशी आलो.

जिना उतरायला लागलो, तो श्रीमंत वर येतांना दिसले.

श्रीमंत काहीही करीत असले, तरी त्यांचा मूळचा डौल जरासुद्धा विस्कटत नसे.

उंच-पुरा बांधा, ताठ शरीर, नितळ-गोरी कांती, चेहऱ्यावर हसरे भाव, डोक्यावर केस विरळ पण इतके साजेसे की, एक केस जरी जास्त असता तरी श्रीमंतांचा साज बिघडला असता, असं वाटावं.

तलम पांढरा सदरा, तसंच तलम धोतर, पट्टयांना मधोमध सोनेरी रेषा असलेल्या तपकिरी रंगाच्या भारी मोलाच्या नाजुक चपला, गळचात सोन्याची साखळी अन् हातात फुलांचा गुच्छ.

श्रीमंतांना बघितलं की, वाटायचं या देहातून रक्त नाही, अत्तर वहात आहे.

डौल बिघडू न देता एक–एक पायरीनं श्रीमंत वर येत होते. मधल्या पायरीशी मी भेटलो.

म्हणाले, "त्यांना झोप लागली असं कळलं."

मी म्हणालो, "नुकताच डोळा लागला."

मी खाली उतरलो. श्रीमंत वर गेले.

श्रीमंतसुद्धा माझ्याप्रमाणेच देवींना खिडकीतून बघणार होते.

देवींना झोप लागली की, श्रीमंत त्यांना दुरून बघण्याकरिता यायचे.

हे असं वर्षानुवर्षं चाललं होतं.

देवींना याची कुणीच कधी कल्पना दिली नव्हती.

त्या प्रासादतुल्य इमारतीत वावरणाऱ्या इतर यच्चयावत् साऱ्यांना हे ठाऊक होतं.

देवींच्या जागेपणी श्रीमंत त्यांच्या समोर जात नसत.

आपण दिसलो की, देवींना मनस्ताप होतो ही जाणीव श्रीमंतांना एक दिवस अचानक झाली, अन् श्रीमंतांनी देवींच्या समोर येणं सोडलं.

त्या राजस पति-पत्नीचे हे असे संबंध !

यात दोष कुणाचाच नव्हता.

उभ्या आयुष्यात श्रीमंतांनी एकदाच फक्त त्या घराचा स्वामी म्हणून आपला अधिकार चालवला होता. आणि त्याचाही नियतीनं विचित्र सूड घेतला होता.

श्रीमंत स्वतः उत्तम शिकारी होते.

आपला एकुलता एक मुलगासुद्धा आपल्याप्रमाणेच शिकारी व्हावा, हा श्रीमंतांचा आग्रह.

मुलाची शिकारीत पडण्याची इच्छा नव्हती.

श्रीमंतांनी एक दिवस जबरदस्तीनं काही शिकारपटूंबरोबर त्याला शिकार शिकायला पाठवलं.

अन् तो स्वतःच एका हिंस्र श्वापदाची शिकार बनला !

तेव्हापासून देवींच्या मनात नकळत श्रीमंतांबद्दल एक अढी निर्माण झाली.

श्रीमंतांचा खानदानी समजुतदारपणा.

त्यांना देवींचा स्वभाव माहीत होता.

ही अढी काढण्याचा कितीही प्रयत्न केला, तरी ती निघणार नाही, याची श्रीमंतांना खात्री होती.

श्रीमंतांनी निमूटपणे देवींच्या नजरेसमोरून दूर होण्याचं पत्करलं.

पाहता पाहता देवींच्या मनोविश्वातून श्रीमंत कायमचे हद्दपार झाले.

देवींना श्रीमंताबद्दल काही–काहीसुद्धा वाटायचं नाही.

श्रीमंतांना मात्र देवींबद्दल ओढ वाटायची.

● ●

# ८. नातं

सरांना वेड लागल्याचं कळलं.

तसं पाहिलं तर सरांच्या इतका सावध माणूस मी उभ्या जन्मात पाहिला नाही.

सरांचं सर्वात महत्त्वाचं वैशिष्ट्य असं होतं की ते सदैव भानावर असायचे.

रस्त्यानं चालताना वारंवार ते मागं वळून पाहायचे. कुणी मागून येत आहे की काय, याचा हमखास अंदाज घ्यायचे.

वळणावर वळण्याची त्यांची एक खास पद्धत होती.

उजव्या दिशेला वळायचं असेल तर वळण यायच्या फार आधीपासूनच त्या दिशेकडे सुरक्षिततेची खात्री करून घ्यायचे अन् प्रत्यक्ष वळण आलं की, डाव्या दिशेकडे जाणाऱ्या रस्त्याला इतके वारंवार न्याहाळायचे की, हे आता डावीकडे वळणार असं त्यांच्याबरोबर असणाराला वाटायचं.

त्यांच्याबरोबर मी असायचा. त्यांची ही पद्धत माझ्या पूर्ण अंगवळणी पडलेली.

त्यांच्या घरी वरच्या मजल्यावर आम्ही बोलत असलो अन् जिन्यात पावलं वाजल्याचा नुसता भास जरी झाला तरी ते पटकन् चपापून "कोण आहे?" असं मोठ्यानं विचारायचे.

सरांचा मी आवडता विद्यार्थी होतो. सर गणिताचे अन् मी गणितात हुशार.

एरवी खूप सावध असलेले सर गणितात शिरले म्हणजे मात्र इकडलं

तिकडलं भान विसरून जायचे.

मग ते गणित एवढंच सरांचं विश्व असायचं.

सरांच्या बरोबरीनं गणित सोडवण्याचा आनंद काही वेगळाच असायचा बुद्धिबळाच्या डावात भराभर जिंकत चालल्यासारखे सर गणित करायचे. त्यांच्या अशा चालण्याचा नुसता पाठलाग करण्यातच मौज असायची.

गणित सुटलं की, सर माझ्या पाठीवर थाप मारायचे.

"शाब्बास बेटया", असं मोठ्यानं म्हणायचे.

तसं ते उगाच नाही म्हणायचे. ते गणित माझ्या हातात पडलं असतं तर ते मी सोडवलंच असतं याची त्यांना खात्री असायची.

स्वत: गणित सोडवलं म्हणजे समोर बसलेल्या मीच सोडवलं अशा विश्वासानं केलेलं ते कौतुक असायचं.

सरांचा सहवास सुटून मध्ये बराच मोठा काळ गेला.

एखाद्या दैवतासारखे सर आठवणीत राहिले.

वेड लागल्याचं कळल्यानंतर पहिला विचार डोक्यात आला, सरांना जाऊन भेटावं.

माहिती काढत गेलो. भेटेल त्याला विचारीत गेलो.

शेवटी जेमतेम एवढं कळलं की, सतत तीन दिवस ते कुठल्या तरी एका गणिताच्या मागे लागले होते अन् काही केल्या ते गणित त्यांना सुटत नव्हतं.

तेही जिद्दीला पेटले अन् गणितही जिद्दीला पेटलं.

शेवटी त्यांचा पराभव झाला. अन् त्या पराभवातून ते बाहेर पडले ते वेड लागूनच.

त्यांनी ज्या विषयावर जिवापलिकडे प्रेम केलं त्या गणितानंच त्यांचा घात केला होता.

कुणीतरी सांगितलं की, घराच्या एका कोपऱ्यातल्या खोलीत ते सदैव हातात पाटी-पेन्सिल घेऊन बसलेले असतात.

पाटीवर सतत आकडेमोड करीत असतात.

गणित सुटलं नाही म्हणून वेड लागणारा माणूस जगाला समजणं कठीणच. सरांच्यानं आता नीटनेटका संसार होणार नाही, याची मला खात्री होती. सर उध्वस्त झालेले आहेत, हे मी आतल्या आत समजून चुकलो होतो. म्हणजे सरांना आता लोकव्यवहार जमणार नाही.

न जमू दे.

पण मला एक कळलं नाही की, सरांनी आपल्या पोटच्या पोराला विहिरीत कां ढकलावं.

सरांचा हा पोरगा माझ्या बरोबरीचा—म्हणजे वयानं.

तो अन् मी आम्ही दोघंही सरांच्या वर्गात एकाच वेळी होतो.

एक खरं की, सरांनी गणितात जसं मला आपल्याबरोबर नेलं तसं मुलाला नेलं नाही. मुलाला समोर बसवून त्यांनी एकदाही गणित सोडवलं नाही. एकदाही "शाब्बास बेटचा," म्हणून त्याच्या पाठीवर थाप मारली नाही. कधी त्याला आपल्याबरोबर फिरायला नेलं नाही.

तरीपण सरांनी त्याला विहिरीत ढकलावं, हे न समजण्यासारखं आहे.

तो म्हणे, एका दुपारी विहिरीत डोकावून पाहात होता, तेव्हा मागून सर हळूच आले अन् त्यांनी दिलं त्याला विहिरीत ढकलून.

आता आजुबाजूचे लोक धावले अन् साऱ्यांनी मिळून त्याला बाहेर काढला, हा भाग वेगळा !

पण तेव्हापासून सरांचं घराशी होतं नव्हतं तेवढंही नातं संपलं.

प्रत्यक्ष मुलाच्या जिवावर उठलेला बाप म्हणून बायकोसहित साऱ्यांनी सरांना वाळीत टाकलं.

सर बाहेरच कुठेतरी मिळेल ते खायचे अन् घरी येऊन आपल्या त्या ठरलेल्या खोलीत पाटी-पेन्सिलशी आकडेमोड करीत बसायचे.

सरांना भेटावं की भेटू नये अशा द्विधा मनःस्थितीत अनेक दिवस घालविल्यानंतर एक दिवस भेटायला म्हणून गावी गेलोच.

गेलो त्याच्या दुसऱ्या दिवशी सकाळी सरांना भेटायला गेलो. सर त्यांच्या त्या खोलीत वळकटीवर पाटी-पेन्सिल घेऊन बसले होते.

डोक्यावरचे अन दाढीचे केस अस्ताव्यस्त वाढले होते.

अंगावरचे कपडे मळके अन् फाटके होते.

खोलीच्या दोन्ही खिडक्या उघडचा होत्या, म्हणून आत प्रकाश लख्ख होता अन् त्या प्रकाशात सर उत्खननात सापडलेल्या हजारो वर्षांपूर्वीच्या मानवी पुतळचासारखे दिसत होते.

मी दरवाजातून हळूच हाक मारली, "सर-!"

ओळखीची हाक ऐकल्यासारखं सरांनी एकदम वर पाहिलं अन् फार वर्षं पुर्वी चपापून विचारीत असत तसं मोठचानं विचारलं, "कोण आहे ?"

आवाजातला खणखणीतपणा कायम होता, पण नजर मात्र पूर्ण उध्वस्त होती.

हळुहळू माझी ओळख पटू लागली, तसतशी नजर गोळा होऊ लागली.

मग हळुहळू स्थिर होत गेली अन् एकाएकी तीत एक चमक आली.

हातातली पाटी-पेन्सिल बाजूला ठेवून ते माझ्याकडे धावतच आले.

त्यांनीं मला कडकडून मिठी मारली.

त्यांचा कणखर आवाज ओलसर झाला.

म्हणाले, " पोरा, अरे कुठं होतास इतके दिवस ? किती जन्मापासून वाट पाहात आहे रे मी तुझी ! मला एक गणित सुटलं नाही रे ! तू असतास तर आपण दोघांनी मिळून ते सोडवलं असतं. तू गेलास अन् मी या जगात एकटा पडलो–अगदी एकटा ! "

त्यांनी आपल्या शर्टच्या खिशातून खूपसे कागद काढले. घाईघाईनं ते चिवडले अन् त्यातला एक खूप चुरगळला गेलेला अन् आता त्यावरची अक्षरंही दिसत नसलेला कागद माझ्यापुढं केला. म्हणाले, " हेच ते गणित."

मी आळीपाळीनं त्यांच्या चेहऱ्याकडे अन् त्या कागदाकडे पाहात होतो.

अन् त्यांनी आपल्या मुलाला विहिरीत का ढकललं असेल याचा अंधुकसा उलगडा मला होत होता.

● ●

# ९ : भूक

ऐन उन्हाळ्यातल्या अशा रखरखीत दुपारी मला माझी ती भूक आठवते.

भुकेल्या पोटी मी भटक भटक भटकलो अन् कैवल्यानंद महाराजांच्या दाराशी जाऊन उभा राहिलो.

मला पाहताच महाराज म्हणाले, " जेवून घे. "

माझं हृदय गद्गदून आलं. डोळ्यात आसवं तरारली.

महाराजांचं माझ्या त्या अवस्थेकडे लक्ष नव्हतं.

त्यांनी कुणाला तरी ताटपाट मांडण्यास सांगितलं. कुणाला तरी वाढायला सांगितलं.

मी पोटभर जेवलो.

महाराज बाजूला बसून होते. त्यांची कृपाळू नजर माझ्याभर पसरली होती.

त्या आधी मी महाराजांना ओळखत नव्हतो अन् महाराज मला ओळखत नव्हते.

पहिला परिचय झाला तो भुकेपासूनच.

महाराजांनी आयुष्यभराचे उपकार आपल्यावर करून ठेवले असं वाटलं.

महाराज क्रान्तिकारकांच्या परंपरेतले.

जेवण झाल्यावर आम्ही देवस्थानच्या मुख्य सभामंडपात येऊन बसलो, तेव्हा महाराजांनी आपला पूर्ववृत्तान्त सांगायला सुरुवात केली. निरनिराळ्या

क्रान्तिकारकांशी कसेकसे संबंध आले ते सांगितलं. काही क्रान्तिकारकांची त्यांना आलेली पत्रं दाखवली, तर काही क्रान्तिकारकांना त्यांनी स्वत: पाठविलेल्या पत्रांच्या प्रतिलिपी दाखविल्या.

एकूण लक्षात आलं की, महाराजांचं रक्त क्रान्तिकारकाचं आहे.

तो सारा पत्रव्यवहार पाहून झाल्यानंतर म्हणालो, " मी चलतो. जेवू घातल्याबद्दल..."

पोटच्या पोराच्या खांद्यावर थोपटावं तसं महाराजांनी माझ्या खांद्यावर थोपटलं. म्हणाले, " पुन्हा जेव्हा केव्हा भूक लागेल तेव्हा इथंच ये."

भूक न लागताही पुन्हा गेलो. जातच राहिलो.

एका क्रान्तिकारकाचं संन्याशात रूपान्तर होणं या कल्पनेत मला उदात्तता दिसली—तेजस्विता दिसली.

एक दिवस एक विचित्र गोष्ट लक्षात आली.

मी गुरुचरित्र नियमितपणे वाचतो. गुरुचरित्राचे चरित्रनायक जे श्रीनृसिंह-सरस्वती आहेत, त्यांचे अनेक चमत्कार या ग्रंथात आहेत.

असे चमत्कार आहेत म्हणूनच काही लोक इष्टफलप्राप्तीसाठी हा ग्रंथ वाचतात.

हा ग्रंथ वाचण्याचे नियम फार कडक आहेत. त्यापैकी फारच थोडे नियम पाळून मी गुरुचरित्र वाचतो.

माझी अशी एक धारणा आहे की, कुठल्याही फलाच्या सिद्धीसाठी मी तो ग्रंथ वाचीत नसल्यामुळे मला इतके कडक नियम पाळण्याची आवश्यकता नाही.

चरित्रनायक श्रीनृसिंहसरस्वती यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी मला कुतूहल वाटतं म्हणून मी तो ग्रंथ वाचतो.

संपूर्ण गुरुचरित्र बरेच वेळा वाचून झाल्यानंतर श्रीनृसिंहसरस्वतींच्या एकूण व्यक्तिमत्वाविषयी माझ्या मनात काही कल्पना तयार झाल्या अन् जी विचित्र गोष्ट माझ्या लक्षात आली असं मी म्हटलं आहे ती ही की गुरुचरित्र वाचतांना नृसिंहसरस्वतींच्या ठिकाणी मी कैवल्यानंद महाराजांना कल्पायला लागलो.

नृसिंहसरस्वती कैवल्यानंद महाराजांसारखेच असावेत, असं मला वाटायला लागलं.

हे असं का झालं, ते मला सांगता येत नाही.

मी महाराजांना तसं म्हणालो, तेव्हा महाराज काहीच बोलले नाहीत.

पण पुढे मला महाराजांमध्ये बदल जाणवायला लागला.

सिद्धी प्राप्त झालेल्या माणसासारखं ते वागायला लागले.

कुणाला अंगारा द्यायचे, कुणाला तीर्थ द्यायचे, कुणाचं भविष्य सांगायचे.

आईबापांची हरवलेली मुलं सापडवून द्यायचे. गुप्त धनाचा शोध लावून द्यायचे.

अंगाऱ्यानं रोगी दुरुस्त व्हायचा. तीर्थानं मनाची पीडा जायची. भविष्य खरं निघायचं.

हळुहळू महाराज बुवा बनले. त्यांचं देवस्थान म्हणजे भोळ्याभाबड्या भाविकांचं तीर्थक्षेत्रं बनलं.

लोकांनी महाराजांना डोक्यावर घेतलं.

महाराजांची भविष्यवाणी देवस्थानच्या परिसरात घुमू लागली.

महाराजांची कीर्तीही दूरवर पसरली.

याचा परिणाम असा झाला की, मला महाराजांजवळ जाता येईना.

त्यांच्यातलं आणि माझ्यातलं अंतर वाढत गेलं.

प्रयत्न करूनही महाराजांची भेट होणं अशक्य झालं.

एक दिवस मला धक्का बसला.

भल्यामोठ्या गर्दीतून प्रयत्नपूर्वक वाट काढीत महाराजांच्या जवळ गेलो, तेव्हा महाराजांनी मला न ओळखल्यासारखं केलं.

गुरुचरित्रामध्ये श्रीनृसिंहसरस्वतींनी एका जन्माच्या स्मृतीला दुसऱ्या जन्मात उजळा दिल्याची एक कथा आहे. कैवल्यानंद महाराज तर याच जन्मीची ओळख विसरू पाहात होते.

नृसिंहसरस्वतींचा आधीचा अवतार श्रीपादश्रीवल्लभांचा. त्या अवतारात झालेला रजक शिष्य. तोच पुढल्या जन्मात म्लेंच्छ राजा होऊन भेटायला येतो. त्यावेळचा अवतार नृसिंहसरस्वतींचा. आपल्या आधीच्या अवतारातली आणि म्लेंच्छ राजाच्या आधीच्या जन्मातली आठवण ताजी करून नृसिंहसरस्वती हसून विचारतात, "अरे रजका, कुठे असतोस हल्ली ?"

ही कथा आठवली आणि नृसिहसरस्वती अन् कैवल्यानंद महाराज यांच्यातलं अंतर लक्षात आलं.

पुढे नृसिंहसरस्वतींच्या ठिकाणी कैवल्यानंदांचं व्यक्तिमत्त्व दिसेनासं झालं.

आता एक मात्र नेहमी होत राहतं. गुरुचरित्र वाचत असताना नृसिंहसरस्वतींनी आधीच्या जन्मीची ओळख काढून मायेनं विचारपूस केल्याचा भाग जेव्हा येतो, तेव्हा एक वेदना साऱ्या हृदयभर पसरते. वाचतांना कंठ दाटून येतो.

● ●

# १० : प्राणहिता

प्राणहितेनं एकदा निरोप घेतल्यानंतर ती पुन्हा भेटेल, असं वाटलं नव्हतं.

तिनं निरोप घेतला होता, तो निर्वाणीचाच घेतल्यासारखा.

म्हणाली होती, "मी जाते. आठवण ठेवा माझी."

पण नंतर लगेच दुसऱ्याच दिवशी भेटली.

बरं, तिला दुसऱ्या दिवशीच्या भेटण्याचं आश्चर्यही दिसलं नाही.

मीच म्हणालो, "काल निरोप घेताना असा घेतलास की, जणू आता पुन्हा आयुष्यात कधी भेटणं नाही."

ती फक्त वीणेच्या झंकारासारखी हसली.

दुसऱ्या दिवशीची ही भेट तिच्या किंवा माझ्या ठरवण्यानं झाली असती, तर तिला आश्चर्य न वाटणं मी समजू शकलो असतो. पण तसं काहीच झालं नव्हतं.

ती सहज निघून गेली होती अन् सहजच पुन्हा भेटली होती.

तिचं हे पहिलं सहज निघून जाणं तिच्या माझ्या ओळखीनंतरचं पहिलंच निघून जाणं होतं.

ओळखही सहजच झाली होती.

ओळखीच्या पहिल्याच भेटीत कशी पट्कन् म्हणून गेली, "आयुष्यात कधीच कुणाकडून खरं प्रेम न मिळाल्यासारखे वागता तुम्ही."

माझ्यावर वेगळाच आघात झाला होता.

मी खोलवर उकरला गेलो होतो.

इतकं सगळं पटकन् समजून घेणाऱ्या प्राणहितेबद्दल मग मला अपार कुतूहल.

कुतूहलातच पहिली ओळखीची भेट संपली.

आपण असा एक वेगळा आघात कुणावर केला, हे प्राणहितेच्या गावीही नाही.

सहज बोलून गेल्यासारखी बोलली अन् सहज निघून गेली.

तिच्या पुन्हा भेटण्याची मला अपूर्वाई. तिला काहीच नाही.

तिला काहीच कसं वाटत नाही, हे तिला विचारलं तर म्हणाली, "त्याचं असं आहे पहा, आपल्या आयुष्यात केव्हा काहीही घडू शकते. आज होणारी भेट ही एखादवेळी शेवटची भेट ठरते. निरोपही पुष्कळदा शेवटचाच ठरतो. भेट अन् ताटातूट यांचं कुठलंही निश्चित गणित मांडता येत नाही."

तसं तिचं म्हणणं चुकीचं नव्हतं. पटण्यासारखं होतं.

तरीही तिच्या प्रत्येक भेटीच्या वेळी मी नव्यानं विस्कटत गेलो.

एकदा सिनेमात भेटली. मध्यंतरात. मैत्रिणींच्या घोळक्यात होती.

मला पाहून घोळक्यातून बाहेर आली. अगदी सहज.

घोळका हसता हसता एकदम थांबला.

प्राणहिता माझ्याजवळ आली. म्हणाली, "पिक्चरला आलात ?"

मी म्हणालो, "हो."

"एकटेच ?" तिनं विचारलं.

"हो," मी उत्तरलो.

"बरोबरच आहे म्हणा ! पिक्चर फार गंभीर आहे. अशा पिक्चरला सोबत म्हणून न्यावं, असं कुणीच मिळालं नसणार. तुमच्यासारख्यांना अंतर्मुख होत होत असले पिक्चर्स पाहणं आवडतं. त्या अंतर्मुखतेला जपणारं सहसा कुणी मिळत नाही. म्हणून मग एकट्यानंच पिक्चर बघणं."

इतकी सारी वाक्यं प्राणहिता एका दमात बोलून गेली.

ही इतकं खरंखरं कसं काय सांगते ?

मी तिच्याकडे पहातच राहिलो.

जणू ती काहीच विशेष बोलली नाही, असं खळाळून हसली अन् पुन्हा परत मैत्रिणींच्या घोळक्यात निघून गेली. घोळक्याचं थांबलेलं हसणं पुन्हा सुरू झालं.

प्राणहितेच्या भेटण्याचं एक वैशिष्टय आहे.

ती कितीही अचानक भेटली तरी आधी ठरवून झालेल्या भेटीसारखा ती त्या भेटीचा स्वीकार करते.

भेटताक्षणीच चट्कन रुळते.

"मागे इथवर आलो होतो, आता इथून पुढे," असा सातत्याचा भाव

प्रत्येक आकस्मिक भेटीत उमटवून जाते.

आणि गंमत अशी आहे की, प्राणहिता ठरवून कधीच भेटली नाही.

हॉटेलात भेटली तीसुद्धा न ठरवताच.

एका टेबलाशी एकटी नुसतीच बसली होती.

नात्यातल्या रुग्णाच्या चौकशीसाठी आलेल्या एखाद्या माणसाकडे पाहून एखादी नर्स, " पेशंट उत्तम आहे," असं सुचवीत हसते तशी ती माझ्याकडे पाहून हसली.

म्हणाली, " बसा, आपण चहा घेऊ."

चहा घेता घेता म्हणाली, " त्यानं मला इथं भेटायला सांगितलं होतं म्हणून आले."

प्राणहिता कुणाला ठरवूनही भेटू शकते, ही कल्पनाच ग्रेट.

" कोण आहे तो ?" मी विचारलं.

" प्रियकर आहे माझा. खूप छान आहे. तुम्हालाही आवडला असता तो," प्राणहिता बोलून गेली—बोलतच राहिली, " पण तो आता येणार नाही. तो मला आता कधीच भेटणार नाही. घाबरला आहे तो. मला दिवस गेले आहेत ना त्याच्यापासून ?"

जगाची रीतच अशी, असं सुचवताना हसावं तशी प्राणहिता हसली. जगाच्या उद्धारासाठी जन्म घेतलेल्या ईश्वराच्या खडतर भाग्यासारखी त्यावेळी ती मला वाटली.

स्टेशनच्या धावपळीत भेटली, तेव्हा ती स्वतःही धावपळीतच होती. माझ्याकडे लक्ष जाताच हसली. जवळ आली.

" कुठं निघालीस ?" मी विचारलं.

ती म्हणाली, " दिल्लीला. एक कॉन्फरन्स आहे. रामकृष्ण मिशनच्या वतीनं."

माझ्या मनात उगाचच तिचा तो प्रयकर घोळत होता.

कुतूहल म्हणून विचारलं, " तू असतेस कुठं हल्ली ?"

" रामकृष्ण मिशनच्या कामात आहे. आसामात असते," तिनं माहिती दिली.

मग तिनं सहज विचारलं, " तुम्ही लग्न केलंत का हो ?"

मी " नाही " म्हणालो, तशी ती पटकन् म्हणाली, " करूही नका. तुमचं मन संसारात रमणार नाही. मी तुम्हाला ओळखलं आहे—पूर्ण ओळखलं आहे."

गाडीची शिटी झाली. अवतारकार्य पूर्ण झाल्याच्या समाधानात हसणाऱ्या ईश्वरासारखी ती हसली अन् आपल्या डब्याकडे धावत सुटली.

## ११ : सैनिकाचं गाणं

सैन्यातून महिन्या–दीड महिन्याची सुटी घेऊन घरी आलेल्या सैनिकानं घरात, शेजारपाजारात अन् गावात रस घ्यावा; पण इतका घेऊ नये की, त्याचं पुढचं अटळ परत जाणं आठवून दुसऱ्याला भडभडून यावं.

अन्तोनला मी माझ्या परीनं हे समजावून सांगण्याचा प्रयत्न केला; पण त्यात ते मनावर घेतलं नाही.

तो सुटीत इथं आला की, फार खोलवर इथला होऊन जातो.

हसतो, खिदळतो, रागावतो, रुसतो.

ज्यांची मुदत सुटीच्या पलिकडे जाईल, अशा योजना आखतो.

पैजा लावतो, जिंकतो, हरतो.

नव्यानं प्रेम करायला लागतो–अन् नव्यानंच द्वेषही करायला लागतो.

कहर म्हणजे रागावून अबोले धरतो.

म्हणजे, मोजक्या दिवसांची सुटी अन् त्यातले काही दिवस अबोल्याचे.

अन्तोनला हे सारं चालतं.

काळाच्या त्या एक–दीड महिन्याच्या तुकड्यावर त्याची संपूर्ण सत्ता असते.

तो सुटीत येईल म्हणून त्याची वाट पाहणारी व तो आला म्हणजे आनंदानं हरखून जाणारी घरी फक्त त्याची म्हातारी आई.

तिच्यावरच रागावून कधीतरी तो पळून सैन्यात गेलेला.

अन् तिनंही तिरिमिरीत आपल्या या एकुलत्या एक मुलाला सैन्यात जाण्याची संमती दिलेली.

आता ती त्याच्या दूर राहण्याला अन् मधूनच घरी येऊन जाण्याला पुरतेपणानं सरावलेली.

तो तिच्या जवळ घरी राहतोच कितीसा ?

दिवसभर भटक भटक भटकत असतो.

तेवढ्यातल्या तेवढ्यात जवळपासच्या एखाद्या खेड्यावरही दोन–तीन दिवस जाऊन येतो.

आई सोडली तर अन्तोनर मनापासून प्रेम करणारं कुणी नाही.

त्याची त्याला पर्वाही नाही.

ज्याच्या प्रेमाची खात्री पटलेली आहे अशा माणसावर ठेवावा तसा अन्तोन माझ्यावर विश्वास ठेवतो.

अन्तोन वयानं माझ्यापेक्षा बराच लहान आहे, पण तो मला आपल्या बरोबरीचा समजतो.

या अशा समजण्याची एक वेगळीच गंमत असते.

आपण एकदम निष्ठुर, बेमुर्वतखोर, बेदरकार अन् बेफिकीर आहोत अन् आता या क्षणी साऱ्या जगाला आपण लाथेच्या ठोकरीसरशी उडवून लावू शकतो–असं एकदम वेगळं वागण्याची मधेच त्याला लहर येते अन् त्या लहरीतला त्याचा सारा तऱ्हेवाईकपणा मला सोसावा लागतो.

मला समोर बसवतो अन् मी समोर नाही अशी कल्पना करतो.

कुणाचा तरी सूड घेण्याच्या विचारात खूप खोल गढून गेल्यासारखा चेहरा करतो. मान तिरकस करून वर आकाशाकडे डोळे नेतो.

गोल उघडलेल्या तोंडातून सिगरेटच्या धुराची दाट गोल वर्तुळं हळूहळू सोडत राहतो.

बराच वेळ.

असा अन्तोन माझ्याखेरीज कुणीच पाहिला नाही.

पण हा अन्तोन खरा नसतो. उसना असतो.

खरा अन्तोन हळवा असतो–हळुवार असतो.

खऱ्या अन्तोनचा हळवेपणा अन् हळुवारपणा तो गाणं म्हणत असताना त्याच्या भसाड्या आवाजाआडून डोकावतो.

अन्तोनचा आवाज गाणं म्हणण्यासारखा मुळीच नाही. भसाडा आहे. पसरट आहे.

तो जे गाणं म्हणतो त्यात कित्येक चुकीचे शब्द असतात.

अन् चालही पार चुकीची असते.

पण तो गाणं म्हणतो.

परत जाण्याला दोन दिवस शिल्लक असले म्हणजे तो गाणं म्हणायला सुरुवात करतो.

सुटीच्या शेवटच्या दोन दिवसात सकाळी, दुपारी अन् रात्री माझ्या घरी येतो अन् मला म्हणतो, "मी गाणं म्हणतो–तू ऐक."

त्याचे गाण्याचे शब्द चुकतात, ते मी त्याला सांगितलं.

तो म्हणतो, "चुकू दे."

त्याची चाल चुकीची असते, तेही मी त्याला सांगितलं.

तो म्हणतो, "असू दे."

तो आवाजात, शब्दात अन् चालीत जरासुद्धा बदल करीत नाही.

बदल न करण्याचं तो जे कारण देतो ते विचार करण्यासारखं असतं.

तो म्हणतो, "आम्ही सैनिक लोक त्या तिथं दूरच्या प्रदेशात या अशाच भसाडच्या अन् पसरट आवाजात, चुकीच्या शब्दांनी अन् चुकीच्या चालींवर गातो. तसंच इथं गायलं की, त्या प्रदेशाचं नातं पुन्हा जुळायला लागतं. सुटीच्या शेवटच्या दोन दिवसात असं सारखं सारखं गायलं की, इथं राहूनही आपण तिथल्या प्रदेशाचे होत जातो. इथले बंध हळुहळू तुटायला लागतात. अन् जातांना माणूस सहज निघून जातो."

अन्तोन जाताना सहज निघून जातो, ही गोष्ट खरी आहे.

त्याला स्टेशनवर निरोप द्यायला जाणारा मी एकटाच असतो.

रात्री अकराच्या सुमाराला गाडी असते.

गाव लहान, त्यामुळं तेवढचा कमी रात्रीच्या वेळेलाही स्टेशन कसं विरळविरळच असतं.

लांब कर्कश शिटी देऊन गाडी निघून गेली की, उरलेला फलाट खूपच सुनासुना वाटतो.

अन्तोननं जातांना सहज उतरवून ठेवलेलं त्याच्या महिन्या–दीड महिन्याच्या जातिवंत जिवंत जगण्याचं ओझं माझ्या खांद्यावर घेऊन मी गावात परत जाण्यासाठी स्टेशनचं फाटक ओलांडतो.

● ●

## १२ : स्वप्नात येणारा वेदव्रत

प्रचीती हमसून कधी रडत नाही.

कधी ऊर फुटल्यासारखीही रडत नाही.

मोगऱ्याच्या फुलांची ओंजळ हळूच मिटवून घेतल्यासारखी ती रडते.

कुणाच्या रडण्यातही समज असते, हे प्रचीतीच्या रडण्यातून पहिल्यांदा कळलं.

खरं म्हणजे, असं समज असलेलं रडणं प्रचीतीशिवाय दुसरं कुणी रडतच नाही.

रडू आलं तर ती नुसती डोळे मिटून घेते. पापणीच्या केसांवर पसरणाऱ्या एखाद्या अश्रूवरून आपण समजायचं की, ती रडते आहे.

ती रडते अन् पट्कन् भानावर आल्यासारखी रुमालानं पापण्या टिपते.

हसते अन् पुन्हा पूर्वीसारखी होते.

प्रचीतीच्या पापण्यांना भक्तीतील विलीनता आहे. म्हणूनच त्या एकाच वेळी रडत असतात आणि स्वप्न पाहात असतात.

ती एकदा मला म्हणाली होती, "आयुष्यात कधी कुणासमोर मी रडले नाही. तुझ्याचसमोर रडले."

मी माझ्या मनाशी काय वाटून घ्यावं, तेच मला कळलं नाही.

माझा गळा बाकी थोडा दाटून आला.

प्रचीतीची दोन रहस्यं मला माहीत आहेत. एक तर तिचं रडणं.

आणि दुसरं म्हणजे तिला पहाटे पहाटे पडणारं एक अगदी ठराविक स्वप्नं.

तिला ते स्वप्न जेव्हा जेव्हा पडतं तेव्हा तेव्हा ती ते मला सांगते.

आणखी कुणालाच सांगत नाही.

प्रचीतीच्या घरासमोरच्या अंगणात उभं राहून समोर सरळ पाहिलं की, टेकडी दिसते.

गावाला चहुबाजूंनी घेरून घेणारी ही टेकडी प्रचीतीच्या घराच्या सरळ समोर येते.

तशी ती आहे अंतरावरच.

पण प्रचीतीचं घर आणि टेकडी यांच्यामध्ये तिसरं काहीच नाही.

प्रचीतीच्या घरासमोर टेकडीचा जो भाग येतो तिथूनच गावाचा दिवस उगवतो.

दिवस उगवण्यापूर्वी पहाटेच प्रचीतीला ते स्वप्न पडून जातं.

स्वप्नात ती टेकडी दिसते.

टेकडीवरून झेपावत येणारं विमान दिसतं.

प्रचीतीचं घर आणि टेकडी यांच्या दरम्यान जे मोकळंच मोकळं मैदान आहे, त्या मैदानावर ते विमान उतरतं.

विमानातून विमानदलाच्या गणवेशातला वेदव्रत हसत हसत बाहेर येतो आणि प्रचीतीच्या ओळखीचं अन् आवडीचं मिस्किल स्मित करीत सैनिकाच्या ठेक्यात तिच्या घराकडे येऊ लागतो.

तिथंच प्रचीतीचं स्वप्न तुटतं.

कितीदा तरी हे स्वप्न पडलेलं आहे.

वेदव्रत कुठं आहे ?

प्रचीतीशी त्याचं लग्न झालं अन् लगोलग त्याला युद्धाचं बोलावणं आलं.

तो विमानदलाचा अधिकारी.

युद्धावर गेला आणि परतलाच नाही.

युद्धात बेपत्ता झालेल्या विमानांच्या यादीत त्याच्या विमानाचं नाव आणि बेपत्ता झालेल्या अधिकाऱ्यांच्या यादीत त्याचं नाव.

तेव्हापासून पत्ता लागलाच नाही.

प्रचीती माहेरी रहायला आली आणि त्याची वाट पहायला लागली.

अशी कितीतरी वर्षं गेली.

चाललीच आहेत.

समोरच्या टेकडीशी प्रचीती भावनेनं बांधली गेली आहे.

प्रचीती अगदी लहानपणापासून ती टेकडी पहाते आहे.

लहानपणीही ती टेकडी तिच्या स्वप्नात यायची.

त्यावेळी पंख असलेले देवदूत टेकडीवरून झेपावत यायचे. पऱ्या यायच्या.

ते सारे समोरच्या मैदानात उतरायचे.

लहानपणाच्या या स्वप्नाबद्दल जेव्हा प्रचीती सांगते तेव्हा ती स्वत:ला वेड्यात काढल्यागत हसते.

आताच्या स्वप्नाबद्दल सांगते तेव्हा प्रत्यक्षात ते घडत असल्यासारखी सांगते.

या स्वप्नाचा तिला फार मोठा आधार वाटतो.

रडताना तिच्या पापण्यांमध्ये हेच स्वप्न असतं का ?

प्रचीतीचं ते स्वप्न कुणी हिरावून घेऊ नये, ही माझ्या मनाची तगमग.

पण माझा इलाज नाही.

प्रचीतीच्या लहानपणापासून तो आजतागायत निर्वेध राहिलेला तिचा आणि त्या टेकडीचा ऋणानुबंध आता दृष्टावला आहे.

मधलं मोकळंच मोकळ मैदान कुणा एका धनाढ्यानं विकत घेतलं आहे.

अन् त्यावर तो एक टोलेजंग इमारत उभी करणार आहे.

ही इमारत पूर्ण झाली की, प्रचीतीकरिता समोरची टेकडी कायमची दृष्टिआड होणार आहे.

टेकडी अन् प्रचीती यांच्या दरम्यान एक प्रचंड भिंत उभी होणार आहे.

आता वेदव्रताचं विमान टेकडीवरून झेपावत आलं तरी ते प्रचीतीला दिसणार नाही.

तसं ते आलंच तर त्या इमारतीवर मागच्या मागे आदळून चक्काचूर होऊन जाईल.

अन् मुख्य म्हणजे त्याला उतरायला आता जागाच कुठं राहणार आहे ?

समोरच्या मैदानावर भलीमोठी आणि उंचच उंच इमारत उभी होणार असल्याची वार्ता प्रचीतीपासून लपून राहावी, यासाठी मी धडपडतो आहे.

● ●

## १३ : फिकट ऊन, भुरकट सावल्या

माझ्या घराची माडी म्हणजे एक मोठा हॉल, त्याला चार दरवाजे आणि सहा खिडक्या.

पैकी पूर्वेकडचे दोन दरवाजे गच्चीत नेणारे आणि त्यांच्या मधला दरवाजा गॅलरीत नेणारा.

दोन टोकांच्या गच्चींना जोडणारी मधली गॅलरी.

माडीचं हे असं थोडं तपशीलवार वाटणारं वर्णन देण्याचं कारण असं की, हॉलमध्ये मी तासन्तास येरझारा मारीत असे आणि कोणत्याही एका गच्चीत उभं राहिलं की, पल्लवीचं घर दिसत असे.

दिवस उतरतानाच्या माझ्या येरझारा संपत ती वेळ पल्लवीच्या परतण्याची.

पल्लवी मला जाताना कधीच दिसली नाही. परततांना फक्त दिसली.

ती कुठून येत असे, याची मी कधीच चौकशी केली नाही.

परतताना ती पाय ओढत चालल्यासारखी चालत यायची. थकलेली असायची.

मुख्य म्हणजे रस्त्यावर एकटी एकटी असायची.

हा रस्ता माझ्या घरासमोरून खूप दूरपर्यंत निघून गेलेला.

माडीवरच्या दक्षिणेकडच्या खिडकीतून बाहेर नजर टाकली की, दूरवर गेलेला तो रस्ता दिसायचा.

येरझारा संपता संपता दुरून येताना दिसणारी पल्लवी आठवणीत

रेंगाळत राहणाऱ्या एखाद्या शुभसूचक स्वप्नासारखी दिसायची.

रस्त्याच्या दोन्ही बाजूंना ठराविक अंतरावर मोठाली कडुनिंबाची झाडं होती आणि उतरत्या उन्हातल्या झाडांच्या सावल्या रस्त्यावर पडल्या की, त्या बैराग्याच्या कपाळावरील भस्माच्या पट्ट्यांसारख्या दिसत.

ऊन–सावलीच्या पट्ट्यांमधून चालत येणारी पल्लवी.

तिच्यामुळे रस्त्याला व्यक्तिमत्त्व यायचं की, रस्त्यामुळे तिला व्यक्तिमत्त्व यायचं ते सांगणं कठीण.

पण रस्ता, पल्लवी, उतरतं ऊन अन् तशा उन्हातल्या त्या सावल्या या साऱ्यांची मिळून एक लय होती.

उतरत्या उन्हातल्या सावल्यांची एक गंमत असते.

त्या सावल्या असतात, पण त्यांना सावलीपण नसतं.

म्हणजे ऊन आणि सावली यांच्यात अनुभवाच्या दृष्टीनं अंतर उरलेलं नसतं.

ऊन फिकट असतं अन् सावली भुरकट असते.

तर, अशा फिकट उन्हाच्या अन् भुरकट सावल्यांच्या पट्ट्यांमधून पल्लवी चालत यायची.

पल्लवी ती तशी शोभायची.

मी तिला तसं म्हटलं तेव्हा ती हसली.

भुरकट सावलीतून फिकट उन्हात आल्यासारखं पल्लवीचं हसणं.

पल्लवीला खळाळून हसताना मी कधीच पाहिलं नाही.

ती न हसण्यावरून हसण्यावर आणि हसण्यावरून न हसण्यावर अगदी जवळच्या अंतरानं जायची.

म्हणजे ती हसत असतांना हसत नसण्याच्या जवळची वाटायची अन् हसत नसताना हसत असण्याच्या जवळची वाटायची.

माझे सारे विचार पल्लवीजवळ संपत.

तिची भेट होण्यापूर्वी वाटायचं की, आपण तिच्याशी खूप बोलणार आहोत. इकडेतिकडे गोळा केलेले सारे अनुभव तिला सांगणार आहोत अन् त्या अनुभवांमधून काढलेले वैचारिक निष्कर्ष तिच्यासमोर बांधणार आहोत.

पण तिच्या घरच्या समोरच्या खोलीत तिच्या त्या ठराविक खुर्चीत ती ठराविक ताठ बसलेली असायची अन् समोर सारे विचार संपलेल्या अवस्थेत दुसऱ्या एका खुर्चीवर मी निवान्त–निवान्त बसलेला असायचा.

अशा वेळी असं वाटायचं की, आपण एक शब्द जरी बोललो तरी परमेश्वराच्या सृष्टी चालविण्याच्या एकूण योजनेमध्ये फार मोठा बिघाड होईल.

पल्लवीचं बसणं उठण्याच्या लागूनच.

वाटायचं की, ही आता बसलेली आहे खरी, पण आत्ताच ती पट्‌कन् उठून उभी राहील.

तशी बसायची तासन्‌तास, पण केव्हा उठून उभी राहील याचा नेम नाही, असं अधांतरी वातावरण ठेवायची.

मुद्दामहून नाही. तिचं एकूण व्यक्तिमत्त्वच तसं होतं. फिकट ऊन अन् भुरकट सावल्या यांच्या पट्ट्यांमधून चालत आल्यासारखं.

कुठल्याही दोन अवस्थांमध्ये फारसं अंतर नसल्यासारखं.

खूप वर्षांनी पल्लवीचं पत्र आलं.

" मुंबईला आल्ये आहे–भेटायला ये."

लग्न करून आफ्रिकेमध्ये मोंबासाला गेली होती.

ती ज्या घराण्यातली त्या घराण्याची रीतच तशी.

गुजराती घराणं.

मुलीचं लग्न करायचं म्हणजे आफ्रिकेत व्यापार करून गडगंज पैसा कमावणाऱ्या गुजराती तरुणाशींच करायचं.

पल्लवीचंही लग्न तसंच झालं.

लग्न ठरलं तेव्हा म्हणाली होती, " मी लग्न करणारेय्."

आता पत्रात लिहिते, " नवऱ्याला सोडून आल्येय्."

आयुष्यातला कुठलाही रंग तिनं गडद होऊ दिला नाही.

सदैव फिकट उन्हातून भुरकट सावलीत अन् भुरकट सावलीतून फिकट उन्हात अशीच चालली.

म्हणूनच ज्याला संसारात रमणं वगैरे म्हणतात ते तिला जमलं नसावं.

● ●

## १४ : संध्याकाळची गोष्ट

किती भयंकर ऊन !

अशा उन्हात उध्वस्ततेची विचित्र जाणीव होते.

असं वाटतं की, आपल्या स्वप्नांच्या वस्तीवर चहूकडून हल्ले होत आहेत.

अशा उन्हात या वस्तीत कायमचं राहायला कुणी येत नाही.

वस्ती स्वतःला कशीबशी सावरत असते.

नाही म्हणायला एखादा चेहरा पाहुणपणासाठी येऊन जातो.

भर उन्हाळयातल्या संध्याकाळला जसा एक दूरचा सुगंध असतो, तसा तो या पाहुणपणाला असतो.

मी ज्या गावातून आलो त्या गावात उन्हाळयाला फक्त संध्याकाळ असते.

अन् ही संध्याकाळ फक्त वैदेहीसाठी असते.

संध्याकाळ आणि वैदेही दोघीच फक्त गावात राहतात.

घरासमोरचं भलंमोठं अंगण पाणी शिंपडून ओलं करण्याचं भान वैदेहीचं.

ते भान घेऊन वैदेही बेभान होते.

अंगणाच्या कोपऱ्यातल्या नळावर बादलीवर बादली पाणी भरायचं अन् ते अंगणाच्या चारी सीमांपर्यंत शिंपडत सुटायचं.

साडी किंचित् वर खोचलेली.

डोक्यावरचे केस सैलसे बांधलेले.

अंगणाच्या एका भागात शिंपडायचं अन् मग दुसऱ्या भागाकडे वळायचं.

सर्व भाग शिपडून झाले की पुन्हा पहिल्या भागाकडे यायचं.

तोवर पहिला भाग सुकत आलेला.

वैदेही जराशी चिडते.

पुन्हा बादलीवर बादली भरून आणून शिपडते.

अंगण सुकायचं थांवतं.

ते सुकायचं थांबल्याची खात्री करून घेण्यासाठी वैदेही अंगणभर तिरप्या नजरेनं पाहते.

राज्यकारभार चोख करणाऱ्या राणीसारखी.

मग वैदेही खोचलेली साडी मोकळी करते.

दोन्ही हातांनी केस मागं चाचपत नेते.

उजव्या हाताचं मनगट कपाळाच्या उजव्या कोपऱ्यावर घासते.

अन् समोरच्या चाळीकडं पाहून मोठमोठ्यानं हाका मारीत सुटते.

चाळीच्या गॅलरीत रंगीबेरंगी फ्रॉकमधल्या छोटचा छोटचा मुली वाटच पहात असतात.

हाक आली की, जिने उतरून दडदड धावत त्या वैदेहीच्या अंगणात येतात.

वैदेही सर्वांचं वर्तुळ बनवते.

वर्तुळ अंगणाच्या अगदी मधोमध.

अन् वैदेही सर्वांबरोबर उडी मारून मट्कन खाली बसते.

सर्वजणी गपगार.

एकटक वैदेहीकडे पहात.

श्वास रोखलेले.

वैदेही बोलायला सुरुवात करते–

"आज मी तुम्हाला गोष्ट सांगणार आहे. एका...ची."

गोष्ट कुणाचीही असू शकते.

राजपुत्राची असू शकते.

राजकन्येची असू शकते.

भिकाऱ्याची असू शकते.

चोराची असू शकते.

लंगडचाची, आंधळचाचीही असू शकते.

वैदेहीच्या गोष्टीत संध्याकाळ बुडून जाते.

मुलींचे चेहरे धूसर व्हायला लागतात.

वैदेहीचाही चेहरा धूसर होत जातो.

मग वैदेही ताड्कन् उठून उभी राहते.

उजव्या हाताची चुटकी वाजवून म्हणते,

"आता उरलेली गोष्ट उद्या!"

मुली नाइलाजानं उठल्यासारख्या उठतात.

जड पावलांनी चाळीकडं चालू लागतात.

कितीतरी वर्षांपासून हे असं चाललं आहे.

आजच्या लहान मुली उद्या मोठ्या होतात.

त्यांची जागा नव्या लहान मुली घेतात.

वैदेही तीच असते.

जशीच्या तशीच.

आताआताशा मात्र मुली जराशी कुरकूर करतात.

त्यांचं म्हणणं, वैदेही गोष्ट नीट सांगत नाही.

म्हणजे गोष्ट सुरू झाल्यापासून ती संपेपर्यंत एक सूत्र रहात नाही.

मुलींना गोष्ट कळत नाही.

कळायला आली रे आली की, मध्येच गोष्टीचा सांधा बदलून जातो.

असं काही होत आहे, हे वैदेहीच्या लक्षात येत नाही.

तिला वाटतं, सारं सुरळीत चाललं आहे.

तिच्या हे लक्षात येत नाही की, पाणी शिंपडता शिंपडता आपण आपल्यालाही नकळत मध्येच थांबून जातो.

अन् अंगणासमोरून गेलेल्या रस्त्यावरून दूरपर्यंत नजर नेत राहतो.

तिच्या हेही लक्षात येत नाही की, कधी कधी अंगण पुरतं ओलं झालेलं नसतं.

आणखी तिच्या हेसुद्धा लक्षात येत नाही की, चाळीतून रोज येणाऱ्या मुलींपैकी एखादी मुलगी एखाद दिवशी आलेलीच नसते.

हे असं का झालं, हे मुलींना माहीत नाही.

त्यांना जर कुणी सांगितलं तर आठवेल मात्र नक्की.

त्यांना आठवेल की, एका संध्याकाळी गोष्टीत अचानक खंड पडला.

अंगणाची सीमा ओलांडून एक तरुण आत शिरला.

थेट मधोमधच्या वर्तुळापर्यंत आला.

तरुण देखणा होता.

राजबिंडा होता.

हसऱ्या चेहऱ्याचा होता.

कपाळावर पुढं आलेले केस मानेला मागं झटका देऊन मागं सारीत त्यानं खूप गडद आवाजात विचारलं होतं.

अत्यंत अदबीनं विचारलं होतं.

"× × × × कुठं राहतात ?"

वैदेहीनं उजव्या बाजूच्या चार बंगल्यांपलिकडे बोट दाखवून उत्तर दिलं होतं–

"त्या तिथं."

मुलींना सांगितलं तर हेही आठवेल की, त्या संध्याकाळी त्यांचे चेहरे धूसर होण्याच्या आधीच वैदेहीनं त्यांना आपापल्या घरी जायला सांगितलं होतं.

● ●

# १५ : स्वामीजी, दिवा अन् काळा पुरुष

स्वामीजी आजारी असले की, मारुतीचा दिवा घेऊन मला जावं लागतं.

रोज रात्री मारुतीच्या देवळात दिवा नेणं हा स्वामीजींचा नियम.

स्वामीजी सर्वच नियमांच्या बाबतीत अतिशय कडक आहेत.

दिवा नेण्याचा तर त्यांचा नियम आहेच, पण जातांना वाटेत कुठेही दिवा विझता कामा नये, हा त्यांचा उपनियम.

तोसुद्धा कडकपणे पाळला पाहिजे.

स्वामीजींच्या मठाच्या उजव्या अंगाला सरळ मागे जाणारा एक लहानसा रस्ता.

हा रस्ता एका पटांगणात संपतो.

पटांगण मोठं.

अन् पटांगणाच्या दुसऱ्या टोकाला कोपऱ्यात मारुतीचं छोटंसं देऊळ.

पटांगणाची सुरुवात ते मारुतीचं देऊळ म्हणजे बरंच मोठं अंतर आहे.

रस्ता संपून पटांगण जिथं सुरू होतं तिथं पटांगणात येणारी दोन चिंचेची अजस्र झाडे आहेत.

म्हणजे पटांगणात शिरायचं ते मुळी त्या झाडांमधूनच.

दोन्ही झाडांची मिळून एक गर्द भयानक सावली असते.

रात्री चंद्र-चांदण्यांच्या लख्ख प्रकाशातही सावली अशी गडदभोर सावली म्हणून असते.

रात्री चंद्र–चांदण्यांचा प्रकाश नसला की सावली नसते. पण झाडाखालून जाताना एखाद्या भयाण गुहेतून चालल्यासारखं वाटतं.

असं वाटतं की, या गुहेच्या कुठल्या तरी कोपऱ्यातून कुणाचा तरी खदखदून हसण्याचा आवाज येईल.

स्वामीजींची तऱ्हा वेगळीच.

त्यांची दिवा घेऊन जाण्याची वेळ रात्री बाराची.

एरवीच ती वेळ तशी फार एकाकी अन् त्यावेळी त्या पटांगणात त्या झाडांच्या मधून जायचं.

स्वामीजी आजारी असले की मला जावं लागतं.

दिव्याची ज्योत विझणार नाही याची परोपरीनं काळजी घ्यावी लागते.

डाव्या हातात दिवा घेऊन रस्ताभर उजव्या हाताचा आडोसा द्यावा लागतो.

झाडांखालून जाताना एरवी दिव्याला धोका नसतो; पण एखादवेळी काय होतं की, पाऊस नुकताच पडून गेलेला असतो आणि वाऱ्यानं झाडं हालली की झाडांवर साचून बसलेले पाण्याचे थेंब सडसडून झडायला लागतात.

तेव्हा दिवा विझू पाहतो.

तो विझू द्यायचा नाही.

तिथून त्याला सुखरूप ठेवून पटांगणाच्या पलिकडेपर्यंत पोचवायचं.

अशी पराकोटीची व्यग्रता अन् एकाग्रता पाळावी लागते.

अलिकडे स्वामीजी लागोपाठ बरेच दिवसपर्यंत आजारी असायला लागले.

त्यामुळे जवळजवळ रोजच मला दिवा घेऊन जावं लागतं.

दिवा नेण्यातल्या व्यग्रतेपायी एक गोष्ट बरेच दिवस माझ्या लक्षात आली नव्हती.

कदाचित् दिवा नेण्याचे प्रसंग अगदी क्वचित् येत त्याही वेळी ते घडत असावं.

पटांगणाच्या एका टोकाला मारुतीचं देऊळ आहे अन् दुसऱ्या टोकाला, मारुतीच्या मूर्तीचं तोंड ज्या दिशेला आहे त्या दिशेला एक मोठी विहीर आहे.

विहिरीच्या मागे एक झोपडीवजा छोटं घर आहे.

त्या घरात एक अत्यंत काळा, कुरूप, उंच, धिप्पाड अन् गुडघ्यापर्यंत नसलेल्या एका मळकटशा धोतराखेरीज सदैव उघडावाघडा, राहणारा सर्वांनाच अनोळखी असणारा एक इसम आहे.

रोज दिवा न्यायला लागलो तशी एक दिवस माझ्या असं लक्षात आलं की, एरवी खूपच खूप शांत असलेल्या त्यावेळी विहिरीवर खिराडीचा लहान कर्कश अन् घासून सरकल्यासारखा आवाज काही वेळ सतत चालू असतो.

तो आवाज थांबला की, जराच वेळात अंगावर भडाभड पाणी घेतल्याचा

अस्ताव्यस्त चौफेर आवाज येतो.

त्यानंतर पुन्हा तोच खिराडीचा आवाज अन् मग पुन्हा तोच अंगावर पाणी कोसळण्याचा आवाज.

बादली विहिरीच्या पाण्यावर आपटून अन् मग ती पाण्यात शिरताना जो एक आवाज होतो तो वेगळाच.

पण हे सारे आवाज सागराच्या तळाशी जाऊन दडलेल्या क्षणासारख्या त्या क्षणांमध्ये एकदम उठून उभे राहतात.

अंगावर पाणी घेणारा तोच काळाकभिन्न, विद्रूप, उंच–धिप्पाड माणूस असतो. सर्वांनाच अनोळखी.

त्याच्या त्या तिथल्या ते सर्व करण्याची मला जाणीव झाली अन् माझ्या दिवा घेऊन जाण्याला एक नवा आयाम मिळाला.

एवढया रात्री नुसती आंघोळ करीत सुटणाऱ्या त्या माणसाबद्दल मला काहीच वाटत नाही.

पण पटांगणाच्या सुरुवातीच्या टोकाला दोन अजस्र झाडांनी मिळून कोर-लेली एक खोल, गडद, गहन अन् प्रचंड गुहा, या गुहेच्या टोकाच्या थेट समोरच्या टोकाला दूरवर मारुतीचं छोटंसं देऊळ, त्या देवळातल्या मारुतीच्या अगदी तोंडासमोर पुन्हा दूरवरच्या टोकाला विहिरीवर भडाभड अंगावर पाणी कोसळ-वीत आंघोळ करीत सुटणारा तो काळाकभिन्न माणूस, अन पटांगणाच्या ऐन मधून विझू न देण्याची काळजी घेत दिवा समोर समोर घेऊन जाणारा मी–हे सारं मिळून एक प्रारब्ध घडत असल्यासारखं वाटतं.

अन् आजारी स्वामीजींचं काय ?

स्वामीजी अलिकडे सारखे अंथरुणाला खिळून आहेत. या पटांगणात घड-णाऱ्या त्या प्रारब्धात स्वामीजींच्या या अलिकडच्या आजारपणाचं काय स्थान ?

एक दिवस स्वामीजींना, मनात काय चाललं होतं ते सांगितलं. स्वामीजी काही तरी गूढ अनाकलनीय बोलतील याची खात्री होतीच.

माझ्या बोलण्यावर स्वामीजी क्षीण स्वरातच तुटक तुटक बोलले, "तो दिवा म्हणजे...दिवसभराच्या साऱ्या...पापपुण्याचा हिशेब घेऊन...देवापर्यंत जाणारी...माझ्या प्राणाची ज्योत...त्या अजस्र झाडांनी...केलेली ती भयाण गुहा संसाराच्या आसक्तीची...ती पार केली . की...ज्योत सरळ देवाजवळ... मी ज्योत नेत असे तेव्हा मला त्या गुहेचं अस्तित्व जाणवत नसे...तुला जाणवतं... तू कच्चा आहेस...अन् विहिरीवर रोज अपरात्री आंघोळ करणारा तो काळा पुरुष...तो काळ आहे...माझ्या गादीवर तुझ्या येण्याची वाट पाहणारा...तुझ्या

पुढल्या स्वागतासाठी रोज रोज स्वतःला धुवून स्वच्छ स्वच्छ करीत नेत...एक दिवस पूर्ण पूर्ण स्वच्छ होऊन जाणार असलेला....

स्वामीजी, तुम्ही म्हणालात त्यातलं जेवढं मला कळलं आहे ना, ते फार भयंकर आहे हो!

कधीही सुटका न होण्यासाठी मला विचित्र रीतीनं बांधून टाकणारं आहे.

स्वामीजी, माझं थोडं ऐकाल का? खरं सांगतो, तुम्ही सांगितलेल्या अर्थाचं आव्हान मला पेलण्यासारखं नाही–खरंच नाही!

● ●

## १६ : केस वाळवणारी मुलगी

तिचं नाव मला माहीत नाही.

चेहरा तर पाहिलेलाच नाही.

तिला फक्त पाठमोरी पाहिली.

खूपदा.

केस वाळवीत उन्हात उभी असतांना.

मुख्य रस्त्याला शाळेकडे जाणारा लहान रस्ता ज्या ठिकाणी काटकोन करून मिळत असे, त्या कोपऱ्यावर तिचं टुमदार दुमजली घर.

घराशी प्रमाण राखून समोरचं अंगण.

अंगणाला मेंदीचं दाट कुंपण.

घराला शोभेल असंच एक फाटक कुंपणाला.

उघडया फाटकातून ती पाठमोरी दिसायची.

आपल्या घराकडे तोंड करून कधी उजवीकडे तर कधी डावीकडे कमरेच्या वरचं शरीर नेटकं झुकवून आपल्या लांबगर्द मोकळया केसांना झोके देत असायची.

कधी एकीचकडे केस लोंबत ठेवून दोन्हीही हातांनी चपळाईनं झटकत असायची.

केस झटकत असतानाच्या तिच्या हातांच्या हालचाली पहात राहाव्याशा वाटत.

हिरव्याकंच फांदीवर खूप पांढरेशुभ्र पक्षी बसलेले असावेत आणि एकदम

भराभर ते सारेच्या सारे एका पाठोपाठ एक उडावेत, म्हणजे डोळ्यांना जे फडफडणं दिसतं ते त्यावेळी दिसायचं.

मोकळ्या लांब केसांमधून वर्तुळात धावणारे तिचे तांबुसगोरे हात अजून आठवतात.

न्हायल्यानंतरचे नितळ नवे हात.

न्हायल्यानंतरचे केस अन् न्हायल्यानंतरचे हात.

न्हायल्याचा एक मंद सुगंध त्या चार–दोन क्षणात उरी दाटून यायचा.

ते घर, ती मेंदी, ते अंगण अन् आपण स्वतः–सारंच न्हायल्यासारखं वाटायचं.

माझ्या आतल्या विश्वातल्या विश्वात ऊर्मी उचंबळवून जाणारे ते चार–दोन क्षण.

त्या क्षणांचा अर्थ मला त्याही वेळी कळला नाही आणि अजूनही कळत नाही.

त्यावेळी मी होतो शाळेत जाण्याच्या वयाचा.

त्या वर्षी सारा हिवाळाभर, मी शाळेत जात असताना, ती मला अशीच पाठमोरी दिसली.

फक्त एकाच हिवाळ्यात.

तिचे वडील सरकारी हुद्यावरचे.

बदलून आमच्या गावात आलेले.

एकच वर्षाकरिता.

त्या हुद्यावरचे म्हणून त्यांना गावाबाहेरचंच समजलं जावं असं ते एकटं, टुमदार, दुमजली घर मिळालेलं.

हुद्देदार बड्या सरकारी अधिकाऱ्याचं घर म्हणून त्या घराविषयी माझ्या मनात एक गूढाची भावना आधीच होती–त्यात या मुलीच्या गूढाची भर पडली.

दर सातेक दिवसांनी नेमकी माझ्या शाळेत जाण्याच्या वेळेला ती तशी पाठमोरी केस वाळवीत उभी असायची, हे तिचं एक गूढ.

समोरून ती कधीच दिसली नाही, हे तिचं दुसरं गूढ.

तिला केस वाळवतांना पाहण्याचा एक गुप्त छंद माझ्या मनाला जडला होता.

तिच्या तशा पाठमोऱ्या दर्शनाची मनाला ओढ लागली होती.

तिचा चेहरा खूप सुंदर असेल, असं वाटायचं. तिच्या चेहऱ्याची सांगड मी नकळत छद्दारीनं सांगितलेल्या त्या सुंदर बाईच्या चेहऱ्याशी घालून टाकली होती.

छद्दारीनं सांगितलेली बाई म्हणजे ती आत्महत्या केलेली बाई–तरुणी.

छद्दारी आमच्या शाळेचा चौकीदार अन् त्या तरुण बाईनं शाळेच्या मागच्या बाजूला असलेल्या संत्र्याच्या बागेतल्या विहिरीत उडी टाकून आत्महत्या केली होती.

छद्दारी म्हणायचा की, ती बाई फार सुंदर होती.

तिच्या आत्महत्त्येचं कारण असं होतं की, तिचं एका तरुणावर प्रेम होतं.

पण त्याच्याशी लग्न करायला तिच्या वडिलांची संमती नव्हती.

छद्दारी म्हणायचा की, शाळा गावाबाहेरच्या ज्या जवळपास निर्जन भागात आहे त्या भागात तिचा आत्मा भटकतो आहे.

आपल्याला एखाद्या चांदण्यांच्या मध्यरात्री ती शाळेच्या मैदानावर, निळसर साडी नेसलेल्या अन् केस मोकळे सोडलेल्या अवस्थेत फिरताना दिसते, असं छद्दारी म्हणायचा.

मुख्य रस्ता जिथं निर्जन वस्तीतून जायचा तिथं ती त्या रस्त्यावर चांदण्यांच्या मध्यरात्री दिसून जायची, असं कुणी सांगायचं, तर मुख्य रस्त्याला मिळणाऱ्या शाळेच्या लहान रस्त्यावर ती अशाच रात्री दिसायची, असं आणखी कुणी सांगायचं.

तिचे मोकळे केस अन् निळसर साडी हे सर्वांच्या सांगण्यात समान असायचं.

लहानपणी अशा सांगण्यावर फार विश्वास बसतो. माझाही बसला.

नुसताच विश्वास बसला नाही, तर ते सांगणं मनात पक्क घर करून बसलं.

केस वाळवणाऱ्या त्या मुलीचा चेहरा चांदण्यांच्या मध्यरात्री फिरणाऱ्या त्या आत्म्याच्या सुंदर चेहऱ्यासारखाच असेल, असं मला वाटलं.

अगदी ठामपणे वाटलं.

ज्या निर्जनशा वस्तीतून तो आत्मा फिरायचा त्याच वस्तीत ती केस वाळवणारी मुलगी राहायची.

त्या चांदण्यांच्या मध्यरात्री फिरणाऱ्या बाईचे केस मोकळे असायचे.

हिचेही मोकळे असायचे.

त्या बाईची साडी निळसर असायची.

हिचीही निळसर असायची.

म्हणूनच मला असं वाटलं असावं की, तिच्यासारखाच हिचा चेहरा सुंदर आहे.

पण गंमत अशी की, पोरवयातलं त्यावेळचं ते उगाचच वाटणं आज या जाणत्यासवरत्या वयात मी जाणीवपूर्वक रुजवत चाललो आहे.

● ●

# १७ : पहिली मूठ जोंधळ्याची

ओसरीवर उन्हाची पहिली किरणं यायची अन् किरणांमागोमाग तो यायचा.

झोळी घेऊन. भजन म्हणत.

तो रोज नवं भजन म्हणायचा अन् प्रत्येक भजन अनोळखी असायचं.

झोळी घेऊन येणारांची भजनं साधारणपणे ओळखीची असतात.

हा जो भजन म्हणायचा त्यातलं एकही ओळखीचं नसायचं.

कुठलं भांडार फोडून त्यानं ही भजनांची माणकं आणली होती कुणास ठाऊक.

म्हणायचा मात्र छान.

त्याच्या आवाजात अनादिपण होतं.

सकाळ फुटून त्यातून तो बाहेर पडला आणि जसा बाहेर पडला तसाच थेट या ओसरीशी आला, असं सारखं वाटायचं.

झोळी पूर्ण रिकामी असायची.

तिच्यात पहिली जोंधळ्याची मूठ माझीच पडायची.

मी इवलासा होतो अन् माझी मूठ तर त्याहूनही इवलीशी होती.

पण त्या इवल्याशा मुठीनंच तो प्रसन्न होऊन मोकळंमोकळं हसायचा.

हसतानाही भजन चालूच असायचं.

जोंधळ्याची मूठ घ्यायचा अन् घराच्या उजव्या बाजूनं असलेल्या रस्त्यानं

निघून जायचा.

माझ्या दृष्टीच्या आड व्हायचा.

तो दृष्टिआड झाला की ओसरीवर ऊन सरसरून यायचं.

जणू ते आतापर्यंत त्या जोंधळचाच्या मुठीसाठी अडून बसलं होतं.

हिवाळचातल्या सकाळचं हे ओसरीवरचं ऊन लळा लावणारं असतं.

ओसरीवरच्या बाकावर मी एकटाच ऊन घेत नुसता बसून असायचा.

बाकाच्या उजव्या हातावर आपल्या उजव्या हाताचा कोपरा टेकवायचा अन् उजवा गाल तळहातावर सोपवून खाली फरशीकडे नजर लावून नुसतंच सुन्न सुन्न बसून रहायचं.

असा सुन्नपणा आला की, हळुहळू त्वचेची दारं उघडायला लागतात अन् ऊन अंगभर पसरत जातं.

देहभर दरवळणारं ऊन.

त्या कोवळचा वयातला कोवळचा उन्हाचा तो दरवळ मी माझ्या आठवणीत गुरुवारच्या आरतीसारखा जपून ठेवला आहे.

ओसरीत उन्हाचा चांगला जम बसायचा अन् डाव्या बाजूच्या खोलीच्या दरवाजातून वडील एकदम ओसरीत यायचे.

ते रोजच असे यावेळी यायचे, पण प्रत्येक दिवशी एकदम आल्यासारखे यायचे.

खोलीतल्या अंधारातून ओसरीतल्या लख्ख प्रकाशात यायचे म्हणून ते एकदम आल्यासारखे वाटायचे.

आणखीही एका कारणामुळे वाटायचे.

ते त्या भल्या सकाळीसच आतून स्नान, पूजा उरकून यायचे.

त्यामुळे ते एकदम नवेकोरे वाटायचे.

त्यांच्या येण्याच्या एकदमपणाचं हे असं आणखी एक कारण.

वडील उंच, सडपातळ देहाचे अन् तरतरीत नाकाडोळचांचे.

पांढऱ्या पडत चाललेल्या केसांचा कसा व्यवस्थित भांग पाडायचे.

सावळा ताठ देह.

पूजा करून यायचे ते फक्त धोतर नेसून.

धोतर पांढरंस्वच्छ.

कमरेवरच्या उघडचा सावळचा अंगावर रुळणारं जानवंसुद्धा पांढरंस्वच्छ.

भाग्यवान पुरुषाच्या ललाटरेषेसारखं.

त्यांच्या सावळचा रुंदशा कपाळावर मधोमध चमकणाऱ्या लाल गंधाचा लहानसा टिका असायचा.

या साऱ्यांनिशी ते असे बाहेर येऊन उभे राहिले की, मूर्तिमंत निग्रह

आकाशातून जमिनीवर उतरलेला आहे, असं वाटायचं.

त्यांच्यासाठी आधीच ओसरीवर एक मोठी सतरंजी टाकून ठेवलेली असायची.

सतरंजीवर त्यांच्या कामाचे कागदपत्र ठेवलेले असायचे.

लिहायला चारपाच पेन.

ते लिहायचे एकाच पेननं, पण दरवेळी वेगवेगळ्या पेननं लिहायचे.

लिहायचे पेन बदलणं हा त्यांचा नाद.

त्या हिवाळ्यातल्या सकाळी ओसरीवरच्या सतरंजीवर त्यांची बैठक असायची खरी; पण त्यांचं मधूनमधून पाठ टेकणं जे असायचं ते मात्र भिंतीशी असायचं.

लोडाशी किंवा तक्क्याशी नसायचं.

लोड–तक्क्या नसायचाच.

मागच्या टेकण्यापेक्षा समोरचं काम महत्त्वाचं असायचं.

सतरंजीवर मांडून ठेवलेल्या कागदपत्रांमध्ये अन् लिहिण्यासाठी असलेल्या कोऱ्या कागदांमध्ये त्यांची बसण्याची एक मोकळी जागा असायची.

त्या जागेत ते चपखल जाऊन बसायचे.

अन् बसताक्षणीच कामाला सुरुवात करायचे.

वकिलीचं काम.

केवळ अडीच तीन हात अंतरावर बसून असलेल्या माझ्याकडेसुद्धा त्यांचं लक्ष नसायचं.

काही वेळ असा जायचा अन् मग एक एक अशील यायचा. यायचा अन् नम्रपणे वडिलांना नमस्कार करून समोर बसायचा. सतरंजी सोडून बसायचा.

पाहता पाहता ओसरी अशीलांनी भरून जायची.

वडील मध्येच मान वर करून चष्म्यातून एखाद्याकडे रोखून बघायचे– अन् त्याला एखादा प्रश्न विचारायचे.

त्यानं फक्त विचारलेल्या प्रश्नाचंच उत्तर द्यायचं. इतर काही बोलायचं नाही.

त्या दरबाराची ती शिस्त बनून गेलेली असायची.

काम असं शांतपणं पुढं सरकायचं.

सकाळही सरकायची.

ऊन हळुहळू प्रखर व्हायला लागायचं.

वडिलांच्या उघड्या अंगाला हळुहळू चटके बसायला लागायचे.

चटके तीव्र व्हायला लागले की, ओसरीतला दरबार बरखास्त व्हायचा.

प्रत्येक हिवाळ्यात सकाळच्या प्रहरी या क्रमानं घटना घडायच्या.

दुरून भजन म्हणत येणाऱ्या झोळीवाल्याच्या रिकाम्या झोळीत माझी जोंधळ्याची पहिली मूठ पडायची.

माझ्या त्वचेची दारं उन्हासाठी उघडी व्हायची अन् माझ्या देहभर कोवळं ऊन दरवळायचं.

अन् ओसरीवरच्या त्या प्रहरभराच्या दरबारातून वडिलांच्या आयुष्याला तालसूर मिळायचे.

● ●

## १८ : तो

माझ्या भल्यामोठ्या घराच्या दर्शनी भागाला दोन बाजूंना दोन मोठ्या षट्कोनी खोल्या आहेत.

हे घराचे समोर आलेले दोन भाग.

खोल्या क्षेत्रफळानं मोठ्या अन् उंचीनंही मोठ्याच. षट्कोनी नळकांड्यासारख्या त्या उंच होत जातात. बाहेरून पाहणाराला त्या आणखीच उंच वाटतात. कारण त्यांची उंची जिथे संपते तिथून वर गच्च्यांच्या तटबंदीचे घेर आहेत.

हे घेरही षट्कोनी.

तटबंदी माफक उंच अन् मधूनमधून अशी पोकळ केलेली की, भरीव भागांच्या रांगा दुरून पाहिल्या म्हणजे गच्चीच्या रक्षणासाठी हत्यारबंद करडे शिपाई अहोरात्र खडे असल्यासारखे वाटते.

समोरच्या मोकळ्या जागेत उघडणाऱ्या दोन खोल्यांच्या दोन मोठ्या खिडक्या.

खोल्यांच्या मधोमध उंचीवर.

त्या खिडक्यांपासून नजर वर सरकवली की, या शिपायांच्या रांगा.

खोल्यांची सपाट षट्कोनी भव्यता अन् त्या भव्यतेवर टाचा रोवून उभे असलेले ते षट्कोनी रांगांमधले दरकदार शिपाई—यामुळे माझ्या घराला देखणेपणाऐवजी दरारा आलेला आहे.

घरासमोर, एकंदरीत दूरच म्हणता येईल इतक्या अंतरापर्यंत मोकळी

मोकळी जमीन अन् हे अंतर संपलं की, घराला समांतर जाणारा गावातला मुख्य रस्ता.

या मोकळ्याच मोकळ्या विस्तीर्ण जमिनीचाही एक वेगळाच दरारा.

आम्हाला जेव्हा जसं जमेल तसं आम्ही आमच्या घराचं अंगण सांगतो.

म्हणजे त्या मोकळ्या भागातल्या एका मर्यादेपर्यंत कधी आमचं अंगण असतं तर कधी दुसऱ्या मर्यादेपर्यंत.

घराला कंपाऊंड करण्याचं कधीच कुणाला सुचलं नाही.

पण ते बरंच झालं.

कंपाऊंड केलं असतं तर त्या परिसरातला अमर्यादपणाचा अनुभव संपला असता.

कोणत्याही षट्कोनाशी समोरून बसलं की, ऊन–पाऊस सरळ अंगावर येतात.

बसणारा इतका पोरका असतो.

तो मात्र या पोरकेपणातच आयुष्य घालवीत आहे.

डोक्याचे आणि दाढीचे मिळून त्याला खूप केस आहेत. इतके ते दाट आहेत की, त्यातून फक्त त्याचे डोळे आणि हसला की दात दिसतात.

डोळे मिचमिचे, पण खोल जाण असलेले.

हसणंही खोल जाण असलेलं.

थोडंसंच.

काही काळे, काही पांढरे असे केस असतानापासून तो त्या षट्कोनाच्या विनआडोशाच्या आडोशाला बसत आहे आणि आता त्याचे केस पूर्ण पांढरे झाले आहेत.

तो अंगभर कपडे घालतो अन् त्याचे कपडे फाटलेले नसतात.

माझ्या घरातल्या आणि घराबाहेरच्या कुणालाच तो कोण आहे हे माहीत नाही.

म्हणजे ते जाणून घेण्याची उत्सुकता कुणालाच वाटली नाही.

ती उत्सुकता उगवण्याआधीच साऱ्यांनी त्याचं अस्तित्व मान्य करून टाकलं.

तो असा मजेशीर रुळला.

घराच्या एकूण परिसराच्या अमर्यादपणाचा तोही एक घटक आहे.

आणि गंमत अशी की, घराचा आणि समोरच्या मोकळ्या जागेचा आहे तसाच त्याचाही दरारा आहे.

काहीच कारण नसताना एखाद्याचा असा दरारा कां वाटावा ?

त्याचा वाटतो खरा.

तो भिक्षा मागून जेवतो तरी हसताना केविलवाणा हसत नाही.

खूप समज असल्यासारखा हसतो.

जग पाहून घेतलेलं असल्यासारखा हसतो.

घरोघरी फिरून गोळा केलेलं अन्न दुपारच्या वेळी त्या विशिष्ट ठिकाणी आणून तो खातो.

खाताना मचामचा खात नाही.

व्यवस्थित बसतो अन् एक एक घास सावकाश खातो.

बसतो उकडच, पण आरामात बसल्यासारखा.

त्याच्यापाशी पाण्यानं भरलेलं एक भांडं असतं.

तो येतानाच कुठून तरी ते भांडं भरून येतो.

घराच्या उजव्या षट्कोनाला बाहेर, षट्कोन संपतो तिथं, एक नळ लावलेला आहे.

समोरच्या मोठ्या रस्त्याला मिळणारा जो एक लहान रस्ता उजव्या अंगानं जातो, त्यावरून जाणारे–येणारे तहान लागली की, या नळावरून पाणी पिऊन जातात.

रस्त्याच्या पलिकडे असलेल्या शाळेतली मुलं मधल्या सुटीत पाणी प्यायला इथंच येतात.

पण तो इथं कधीच आला नाही.

त्यानं आपलं पाणी बाहेरूनच आणलं.

आणि अन्नही.

त्याची गंमत अशी की, त्यानं इतक्या वर्षांत एकदाही आमच्या घरी भिक्षा मागितली नाही.

आमच्या घरी नाही अन् आमच्या घराच्या आसपासच्याही घरी नाही.

तो आपल्या अन्नपाण्यासाठी या परिसरावर अजिबात अवलंबून नाही.

म्हणूनच त्याचा इथं नकळत एक दरारा निर्माण होऊन गेला असावा.

माझ्या घरात येणाऱ्याकडे अन् घरातून जाणाऱ्याकडे, मान उजवीकडे वळवून तो पाहतो आणि खूप समज असल्यासारखा हसतो.

जाणारा–येणाराला त्याच्या समजुतदार पाहण्याची आणि हसण्याची सवय झालेली आहे.

प्रत्येकाची नजर नकळत त्याच्याकडे वळते.

दुपारपासून अंधार पडेपर्यंत तो तिथं असतो.

अंधारात कुठं निघून जातो, ते कळत नाही.

कुणी ते जाणून घेण्याचा प्रयत्नही केला नाही.

तशी आवश्यकता कुणाला वाटली नाही.

त्याच्या येण्या–बसण्याप्रमाणंच त्याचं हे निघून जाणंही साऱ्यांनी स्वीकारून

टाकलं आहे.

अज्ञातातून आल्यासारखा येतो अन् अज्ञातातच गेल्यासारखा जातो.

जोपर्यंत असतो तोपर्यंत जग पाहून घेतलं असल्यासारखा तुमच्याकडे पाहतो आणि तुम्हाला पूर्ण समजून घेतलं असल्यासारखा हसतो.

तो कुणाशीच बोलत नाही अन् त्याच्याशी कुणीच बोलत नाही.

तो एकाच वेळी खूप गूढ असतो अन् खूप ओळखीचा असतो.

● ●

## १९ : पद्मिनी

त्या दगडांच्या मोठ्याशा कमानीतून नदीचं पात्र पाहतांना मला पद्मिनीच्या आरशातल्या रूपाची आठवण झाली.

नदीचं पात्र शांत आणि संथ.

राज्याचा कारभार चोख चालविणाऱ्या राणीसारखी ती नदी मला वाटली.

माझ्याबरोबर आलेल्या चित्रकाराला मी विचारलं, "हा सारा परिसर असाच्या असा चित्रबद्ध करता येईल ?"

चित्रकार म्हणाला, "ही संध्याकाळची वेळ. आता चित्र काढायला बसलो, तर चित्र अर्धवटच राहील. कारण अंधार पडायला लागेल."

हळहळ वाटली. थोडे आधी आलो असतो तर चित्रकाराला अगदी व्यवस्थित बैठक मारून चित्र काढता आलं असतं.

पण नंतर असंही वाटलं की, कमानीतून दिसणाऱ्या नदीच्या रूपात आपल्याला जसं पद्मिनीचं रूप दिसलं तसं चित्रकारालाही दिसलं असतं कां ? आणि दिसलं असतं तरी त्याला ते चित्रात कसं आणता आलं असतं ?

आणि ते जर त्याला चित्रात आणता आलं नसतं तर माझ्या दृष्टीनं चित्रात कुठला जिवंतपणा राहिला असता ?

मी चित्रकाराला माझी कल्पना सांगितली. तो म्हणाला, "पद्मिनीचं आरशातलं रूप पाहायला आपण अल्लाउद्दीन आहोत की काय ?"

आता मला माझ्या गाफिलगिरीची जाणीव झाली. पद्मिनीचं आरशातलं

रूप एकटया अल्लाउद्दीननंच बघितलं होतं.

पण त्या प्रसंगावर पुढल्या शतकांनी इतकं काही चिंतन केलेलं आहे की, पद्मिनीच्या प्रत्यक्ष रूपापेक्षा आरशातलंच रूप अमर झालं आहे.

तिचं एका सुंदर कविकल्पनेत रूपांतर झालेलं आहे.

आता हे रूप बघायला आपण अल्लाउद्दीन असण्याची गरज नाही.

मी चित्रकाराला तसं सांगितलं.

चित्रकार म्हणाला, "जाऊ दे रे! कसली शतकं अन् कसलं चिंतन? आपण अंधार पडायच्या आत या भागात थोडा फेरफटका मारून येऊ. उद्या सकाळी उठल्यानंतर चित्र काढायचं आहे मला. आसपास कुठं एखादं दृश्य सापडतं का ते बघू."

आम्ही फिरू लागलो. परिसर चांगला होता. म्हणजे आल्हादकारी होता.

आठही दिशा इतक्या मोकळ्या होत्या की, मावळतीचा सूर्य आम्हाला पटकन् दिसला.

परिसर उध्वस्त इमारतींचा दिसला.

इमारतींमध्ये राहणारं कुणी नाही.

इमारतीची जडणघडण त्या तशा उध्वस्त स्थितीतही ओळखू येत होती.

या इमारती ज्या काळात उभ्या झाल्या असतील, त्या काळानंतर काही शतके उलटली असतीलच.

म्हणजे इमारती उभ्या झाल्या. काही वर्षं ताठ मानेनं उभ्या राहिल्या. मग हळूहळू एकेका इमारतीचा एकेक भाग पडत गेला.

आता इमारतींचे थोडे थोडे भाग शिल्लक राहिले आहेत.

या उध्वस्त इमारतींमध्ये मला शतकांचं चिंतन दिसलं.

त्यांच्यामधून जात असतांना असं वाटलं की, पद्मिनीचं आरशातलं रूप बघण्यातलं अल्लाउद्दीनचं कपट त्याच इमारतीमधल्या चिंतनानं इतिहासजमा केलेलं आहे.

आता अल्लाउद्दीन नाही अन् त्याचं कपट नाही.

आता फक्त पद्मिनीचं आरशातलं सुंदर रूप आहे.

कमानीतून दिसणाऱ्या नदीच्या पात्राचा अन् या पडझड झालेल्या इमारतींचा कसा छान मेळ जुळून आला!

चित्रकाराला या उध्वस्त इमारतीमधलं शतकाचं चिंतनही चित्रबद्ध करता आलं नसतं.

नुसत्याच पडक्या इमारती चित्राचा विषय होऊ शकल्या नसत्या.

पडक्या इमारतींभोवती फिरून आम्ही एका उंचशा जागी उभे राहिलो. तिथून सूर्यास्ताचं दृश्य पाहिलं.

हळुहळू खाली जात जात सूर्य पूर्ण बुडाला.

मग थोडाच वेळ उणापुरा प्रकाश राहिला अन् मग अंधारून आलं.

चित्रकार म्हणाला, "चलायला हवं. गाव खूप दूर आहे."

गाव खरंच खूप दूर होतं. आम्ही जिथं उभे होतो त्या प्रदेशात मनुष्य-प्राण्याचा मागमूसही नव्हता.

नदीकडे आल्याशिवाय गावचा रस्ता लागत नव्हता.

आम्ही परत नदीकडे आलो.

टॉर्चच्या प्रकाशात मार्ग काढीत.

त्या दगडी कमानीशी आलो आणि आम्हाला नदीच्या पात्रात दिवे तरंगतांना दिसले.

काळोख हळुहळू दाट होत जाऊन आता मिट्ट झाला होता.

चहुबाजूंनी मिट्ट काळोख अन् नदीच्या पाण्यात हलक्याशा लयीत झुलणारे कितीतरी दिवे.

हे दिवे कसे आले ? कुठून आले ?

आम्ही कमानीजवळ गेलो. कमानीपासून ग्रामीण पेहरावाच्या स्त्रियांची एक रांग लागली होती. ती रांग कमानीजवळ पोचत होती, असं म्हणणं जास्त योग्य.

रांगेतल्या प्रत्येक स्त्रीच्या हातात दिवा होता. रांग हळुहळू पुढे सरकायची अन् पलिकडच्या दगडी पाळीवर उभी राहून एकेक स्त्री नदीत हळूच दिवा सोडायची.

मग ती निघून जायची.

ही रांग कुठवर आहे, हे पाहण्यासाठी आम्ही दूरवर नजर टाकली.

अज्ञातातून आल्यासारखा एकेक दिवा त्या दिव्यांच्या रांगेत सामील होत होता.

असं अखंड चाललं होतं.

ती रांग ज्या जमिनीवर उभी होती त्या जमिनीला दूर एक उतार होता. अन् हा उतार चढून येऊन दिवा घेतलेली एकेक स्त्री त्या रांगेत सामील व्हायची.

त्यामुळे रांगेत सामील होणारी प्रत्येक स्त्री अज्ञातातून आल्यासारखी वाटायची.

अज्ञातातून आल्यासारख्या त्या स्त्रिया, त्यांच्या हातातल्या दिव्यांनी तयार केलेली दिव्यांची रांग अन् नदीत तिच्या स्पंदनासारखे तरंगणारे दिवे.

अज्ञातातून येऊन पुढे सरकत राहणाऱ्या त्या रांगेतही शतकांचं चिंतन आहे, असं मला वाटलं.

चित्रकाराला हे चिंतन दिसलं नसतं.

तसं त्या दृश्यात चित्र काढण्यासारखं काही नव्हतं.

पण जरी त्यानं चित्र काढलं असतं तरी त्यात हे शतकांचं चिंतन आलं नसतं.

म्हणजे माझ्या दृष्टीनं ते चित्र जिवंत झालं नसतं.

प्रकाश असताना दगडी कमानीतून दिसलेलं नदीचं पात्र अन् त्या उध्वस्त इमारती आणि आता काळोखात नदीत दिवे सोडायला पुढे सरकणारी ही स्त्रियांची रांग यांचं परस्परांशी कुठलं तरी नातं आहे, असं मला वाटलं.

कमानीतून दिसणाऱ्या नदीच्या पात्राला पद्मिनीच्या आरशातल्या रूपाशी उध्वस्त इमारतींनी जोडलं अन् काळोखातल्या या तरंगत्या दिव्यांनी त्या पद्मिनीच्या मूळच्या तेजस्वी रूपावर पुन्हा नव्या तेजाचा साज चढवला.

माझ्या सोबतच्या चित्रकाराला या साऱ्या दृश्यांचा नेमका हा अर्थ कळेल का ? कळला तरी चित्रबद्ध करता येईल का ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## २० : वाटाड्या

थंडी ओसरत चाललीय्.

ओसरत्या थंडीचा एक थेंब माझ्याजवळ आहे.

किल्ल्याशी येऊन पोचतो, तेव्हा सकाळ स्थिरावली असते.

किल्ल्याकडे जाणारा एक ठरलेला रस्ता नाही.

कुठूनही किल्ल्याला जायचं.

जातांना कधी एखादं उंच टेकाड लागतं तर कधी एकदम खोल खळगा.

झोके घेत गेल्यासारखं जाणं.

हे जाणं एकटयाचं असावं.

म्हणजे मग एक लय सापडते.

विशेषत: ओसरत्या थंडीच्या सकाळी.

आम्ही बारा जण असतो.

किल्ल्याबद्दल आधी केलेल्या कल्पना अन् प्रत्यक्ष किल्ला यात कितीतरी अंतर असतं.

दुरून तर, कुणा बलाढ्य शत्रूनं तोफांच्या माऱ्यानं भुईसपाट करून टाकल्यासारखा किल्ला दिसतो.

निजलेली जमीन.

ओसरत्या थंडीच्या सकाळी ही अशी जमीन स्वप्नं पहात असावी.

किल्ल्याला प्रवेशद्वार आहे.

भलंमोठं.

किल्ल्यात शिरण्याची भावना मनात ठेवून जायचं असतं म्हणून या प्रवेशद्वारातून शिरायचं.

एरवी काळ्या कुळकुळीत भक्कम फत्तरांच्या भव्य चौकटीच्या या प्रवेशद्वाराच्या आजुबाजूला आत शिरण्यासाठी कुठलाही अटकाव नाही.

सारं मोकळंच मोकळं.

असं एकाकी अजस्र प्रवेशद्वार पाहिलं की, उजाड वस्तीच्या मजबूत बांधलेल्या रेल्वेस्थानकाची आठवण होते.

प्रवेशद्वाराच्या पुढ्यातून लक्ष्मणरेषेसारखा एक अरुंद रस्ता जातो.

हा रस्ता संपूर्ण किल्ल्याभोवती वर्तुळाकार फिरतो.

रस्त्याच्या वर्तुळात सामावलेला सारा परिसर किल्ल्याचा.

म्हणजे तसं म्हणायचं.

एरवी रस्त्यापासून खूप आतपर्यंत एक थकलेलं उजाडपण.

आत इतिहासाचा मारा सोसत कशीबशी उभी असलेली एक बऱ्यापैकी उंचीची वास्तू आहे.

प्रवेशद्वारापासून या वास्तूपर्यंतचं अंतर अर्ध्या मैलाचं.

म्हणजे वर्तुळाकार रस्त्याचा व्यास एक मैलाचा.

प्रवेशद्वाराशी वाटाड्या लागतो.

आताच्या उजाड जमिनीवर फार फार वर्षांपूर्वी कुठे काय उभं होतं, ते तो सांगतो.

स्वारीवर निघालेल्या राजासारखा ऐटीत पुढे चालतो.

शिवाजी महाराजांचं एक चित्र आहे.

महाराज साथीदारांसह घोडा दामटीत चालले आहेत अन् घोड्यावर बसल्याजागीच जरा ओणवे होऊन तलवारीचा हात पुढे फेकीत स्वारीचा रोख सुचवताहेत.

महाराजांच्या तलवारीच्या हातासारखा आपला उजवा हात समोर फेकीत वाटाड्या पायी चालला असतो.

किल्ल्याच्या अजून जाग्या असलेल्या मूळ वास्तूशी आम्ही येतो अन् त्या वास्तूलाही एक छोटं प्रवेशद्वार असल्याचं लक्षात येतं.

हे प्रवेशद्वार मात्र एकाकी नाही.

आजुबाजूला त्याच्याच उंचीची समजुतदार भिंत आहे.

मूळ वास्तूत शिरतो अन् मनाच्या तळापर्यंत अंतर्मुखता साचत जाते.

वाटाड्याच्या सांगण्याला बहर आलेला आहे.

वरच्या मजल्यावर डाव्या अंगाला ज्या दोन खोल्या दिसताहेत ना, त्यापैकी

एक राजाची अन् एक राणीची.

या इथं खाली उभं राहून नुसती हळूच टाळी वाजवली तरी राजा–राणीच्या खोल्यांमध्ये तिचे मोठ्यानं पडसाद उमटायचे.

ज्याचं काही गाऱ्हाणं असेल, त्यानं इथं उभं राहून हळूच टाळी वाजवायची.

म्हणजे राजा–राणी खोल्यांमधून बाहेर येत असत.

गाऱ्हाणं ऐकत असत.

टाळीसारखंच गाऱ्हाण्याचंही.

हळूच सांगितलं तरी दोघांच्याही कानांना स्पष्टपणे ऐकू जायचं.

गाऱ्हाणं पूर्ण ऐकून घेऊन राजा गाऱ्हाणं करणाराला जायला सांगायचा.

रात्री गाऱ्हणं घेऊन येणारांसाठी ही खास व्यवस्था होती.

दुसरे दिवशी अगदी सकाळी दरबार बोलावून राजा गाऱ्हाण्यावर चर्चा करायचा.

निर्णय घेऊन लगेच कारवाईही करायचा.

गाऱ्हाणं करणारा कधीकधी मध्यरात्रीसुद्धा यायचा.

ही झाली राजाराणीची गोष्ट.

राजकन्येची गोष्ट वेगळी होती.

उजव्या अंगाला ती खोली दिसते आहे ना,

समोर गच्ची असलेली,

ती राजकन्येची खोली.

गच्चीतून पायऱ्या खाली आलेल्या.

रोज रात्री राजकन्येला भेटायला एक राजपुत्र यायचा.

तो कोण, कुठला हे राजकन्येशिवाय कुणालाच ठाऊक नव्हतं.

त्याच्या येण्याची कुजबुज फक्त होती.

लोकांनी खूप लक्ष ठेवलं.

राजाराणींनीही ठेवलं.

राजकन्येच्या खोलीभोवती पहारे बसविले.

पण राजपुत्र कुणाला दिसला नाही.

तो यायचा थांबला नाही.

राजकन्येला भेटायचा थांबला नाही.

राजकन्येला भेटून जाताना तो तिच्या दाराशी फुलांची ओंजळ ठेवून जायचा.

ओंजळीवरून लक्षात यायचं तो येऊन गेल्याचं.

राजपुत्र काही केल्या सापडेना.

म्हणून राजा एक दिवस चिडला.

मध्यरात्री राजकन्येच्या गच्चीत आला.
दाराशी फुलांची ओंजळ पडली होती.
म्हणजे राजपुत्र येऊन गेला होता.
राजानं रागारागानं फुलांची ओंजळ ठोकरली.
अन् फुलं आकाशात उडून गेली.
त्यांच्या चांदण्या बनल्या.
–अशी ही दंतकथा–
वाटाड्यानं सांगितलेली.
आम्ही ऐकलेली.
अशा दंतकथा वाटाड्यांच्याच तोंडून ऐकाव्या.
म्हणजे त्या खऱ्या वाटतात.
ओसरत्या थंडीच्या सकाळी त्या खऱ्या होतात.

## २१ : आज्ञा

सन्निधान समोरच्या टेकडीवर राहात होता.

टेकडी समोर दिसते म्हणून ती समोरची.

एरवी आम्ही गावातले लोक जिथं रहातो, तिथून ती टेकडी बरीच दूर आहे.

टेकडीकडून एक रस्ता गावात येतो.

पायवाटेसारखा.

निर्जन टेकडीपासून गावापर्यंत पायवाट असणं ही अशक्य कोटीतली गोष्ट.

परंतु तशी पायवाट आहे खरी.

त्या पायवाटेनं आधी कोण केव्हा आला असेल कोण जाणे.

पण आताशां सन्निधान मात्र यायचा.

सन्निधान टेकडी उतरताना कधीच कुणाला दिसला नाही.

पायवाटेनं येताना मात्र दिसला.

उंच सडसडीत सावळा देह, निमुळती दाढी, भेदक डोळे.

अन् अंगाअंगातून तरतरीतपणाचा ठेका.

गळ्यात रुद्राक्षाचा एकच मणी.

कमरेभोवती लालभडक पंचा.

दुरून टेकडीकडे पाहिलं की, तो त्याच्या या सर्व खाणाखुणांसह वीतभर दिसायचा.

जास्त वेळ टेकडीवर दिसायचा म्हणून तो टेकडीवर रहातो असं लोक म्हणायचे.

टेकडीवर बहुधा त्यानं एक लहानशी झोपडी बांधली असावी.

दीड वितीची ती झोपडी गावातून दिसायची.

झोपडी आणि सन्निधान दोघेच फक्त दिसायचे.

सन्निधान खात काय असेल ?

पाणी कुठलं पीत असेल ?

गावातून काही मागून नेताना तो कधी दिसला नाही.

गावात दिसायचा मात्र.

झप्झप् चालताना.

गावातल्या प्रत्येकानं त्याला झपझप चालतानाच पाहिलं.

तो उभा असलेला किंवा कुणाशी बोलत असलेला कधीच कुणी पाहिला नाही.

एक मजेदार कल्पना डोक्यात यायची.

वाटायचं, हा सुईदोऱ्यासारखा गावातल्या वस्त्या एकमेकींना शिवत चालतो.

गंमत अशी की, गावात कुणीच त्याची चौकशी केली नाही.

तो टेकडीवर रहातो आणि गावातून चालतो एवढ्या कळण्यावरच लोकांनी समाधान मानलं.

लोकांनी त्याला गृहीत धरलं.

काल किंवा आज सन्निधान दिसला नव्हता, एवढंच फक्त एक दुसऱ्याला सांगायचा.

आज टेकडीवर सन्निधानची काही हालचाल दिसली नाही, एवढीच फक्त त्यातल्या त्यात नवीन माहिती असायची.

त्याचं नाव लोकांना कसं ठाऊक झालं हे मात्र गूढ होतं.

एकजात सर्वजण त्याला सन्निधान म्हणायचे.

टेकडीपासून गावापर्यंत जी पायवाट येते ती गावातल्या मुख्य रस्त्याला मिळते.

ती त्या रस्त्याला जिथं मिळते त्याच्या विरुद्ध बाजूला माझं घर.

इतकं थेट की, पायवाटेनं निघालेला माणूस माझ्याच घराकडे येतो आहे असं वाटावं.

अनेक वर्षं पायवाटेनं कुणीच आलं नाही म्हणून सन्निधानच्या येण्याबद्दल मला कुतूहल.

सन्निधान येताना दिसला की मी घराच्या फाटकाशी जाऊन उभा रहात असे.

सन्निधान माझ्याकडे अजिबात लक्ष देत नसे.

पायवाटेनं मुख्य रस्त्याला लागायचा आणि भीष्माच्या प्रतिज्ञेसारखा सरळ गावात निघून जायचा.

असं कितीतरी दिवस चाललं.

त्या दिवशी सन्निधान माझ्या घराशी थोडा घुटमळला.

माझ्याकडे पाहून उगवत्या सूर्यासारखा हसला.

माझ्या जवळ आला.

त्याच्या व्रतस्थ कायेवर नियतीच्या अटळपणाची वज्रमोहोर दिसली.

तो झपझप् जवळ आला.

अन् आकाशवाणी झाल्यासारखा म्हणाला, "आम्ही लवकरच जाणार."

अन् मग बोलतच राहिला.

आपला सारा पूर्ववृत्तान्त त्यानं मला सांगितला.

तो कुठल्याशा दूर देशातला.

मूळचा श्रीमंत, रंगेल, रसिक.

कुठल्या तरी साधूची नजर त्याच्यावर पडली.

साधू त्याच्या वडिलांना म्हणाला, "हा मुलगा आम्हाला द्या."

वडिलांनी ते मनावर घेतलं नाही. यानंही घेतलं नाही.

साधू मेल्यानंतर मात्र चमत्कार झाला.

त्याच्या वृत्तीत बदल होत गेला.

हा विरक्त झाला.

यानं बंगला, ऐषआराम, मोटारगाडी या साऱ्यांचा एका क्षणात त्याग केला.

म्हणाला, "आम्हाला आज्ञा झाली, आम्ही चलतो."

तेव्हापासून लालभडक पंचा आणि रुद्राक्षाचा एक मणी एवढ्या भांडवलावर हा ठिकठिकाणी फिरतो आहे.

तो साधू स्वप्नात येतो आणि सांगतो, "आता इथला मुक्काम संपला, इथून अमुक ठिकाणी जायचं."

हा तडक तिथून सांगितल्या ठिकाणी जातो.

अशी आज्ञा अन् असं आज्ञेचं पालन.

तो जायचं म्हणाला तेव्हा असं वाटलं की, या टेकडीवरून दुसऱ्या ठिकाणी जाणार.

पण प्रत्यक्षात भलतंच झालं.

काल रात्री खूप जोराचा पाऊस आला.

खूप वेळ.

मेघांचा कानठळ्या बसवणारा गडगडाट.

विजांचा अस्तित्व उसकटून टाकणारा लखलखाट अन् कडकडाट.

आकाशाचा ब्रह्मराक्षस पृथ्वीवर झेपावला जणू.

करकरा दात खात.

अन् मधेच एक विजेचा लोळ आकाशातून उतरला अन् समोरच्या टेकडीवर विसावला.

गावातल्या पुष्कळांनी तो पाहिला.

सन्निधानचं काय झालं असेल ?

पावसाचं तांडव संपल्यानंतर जो तो दुसऱ्याला सन्निधानबद्दल विचारू लागला.

आता लक्षात आलं की सन्निधान गावाच्या खोल हृदयात शिरून बसला आहे.

कुणाशी काहीही न बोलता.

कुणापासून काहीही न घेता.

कुणाला काहीही न देता.

कुणीतरी टेकडीवर जाण्याचा आटापिटा केला.

आजपर्यंत कुणीच टेकडीवर गेलं नव्हतं.

आज कुणीतरी टेकडी चढून गेलं.

जाणारानं परत येताना बातमी आणली,

सन्निधान मरून पडला आहे !

सर्वांनाच खूप वाईट वाटलं.

त्याच्या शेवटच्या क्रियाकर्माची व्यवस्था करण्याकरिता लोक टेकडीवर धावून गेले.

मिळेल त्या वाटेनं टेकडीवर चढले.

मी मात्र फाटकाशी खिळल्यासारखा उभा.

थिजून गेलो.

या सृष्टीत प्रचंड उलथापालथ घडून येत आहे असं मला वाटत आहे.

कालच सन्निधान माझ्या फाटकाशी पुन्हा थांबला होता.

माझ्या मुलाकडे पाहून त्यानं विचारलं होतं, " हा मुलगा तुमचा आहे ?"

मी 'हो' म्हणालो होतो.

" एकटाच आहे ?" त्यानं विचारलं होतं.

याही प्रश्नाला मी 'हो' म्हणालो होतो.

सन्निधान ताडकन् म्हणाला होता, " हा मुलगा आम्हाला द्या."

तो तेवढंच वाक्य म्हणाला अन् भीष्मप्रतिज्ञेसारखा पुन्हा झपझप् गावात निघून गेला !

● ●

## २२ : ओढ !

या घराशी गाव संपतो.

घराच्या उजव्या अंगानं गावाचा रुंदसा मुख्य रस्ता सरळ गावाच्या बाहेर निघून जातो.

एकाएकी संसारातून उठून सरळ निघून जाणाऱ्या सिद्धार्थासारखा.

घराच्या थेट मागे एक खोली आहे—स्वयंपाकघराला लागून.

या खोलीच्या खिडकीत उभं राहिलं की, दूरदूर निघून जात असलेला तो रस्ता दूरपर्यंत दिसतो.

नजरेचा टप्पा किती मर्यादित !

पण पुढं जात जात नजरेच्या टप्प्यातून एकदम निसटून जाणारा रस्ता एक वेगळंच कुतूहल निर्माण करतो.

त्या रस्त्यानं गावात येताना अन् गावातून जाताना मी फार थोड्यांना पाहिलं.

रात्री तर कुणीच येत जात नाही.

गंमत अशी की, या रस्त्याच्या दोन बाजूंना जी दिव्यांची रांग आहे, तीसुद्धा रस्त्याप्रमाणेच दूरवर जाऊन अदृश्य झालेली आहे.

जणू या रस्त्यानं रात्री खूप रहदारी असते, असा एकूण दिव्यांच्या रांगांचा देखावा असतो.

स्वयंपाकघराजवळच्या खोलीच्या त्या खिडकीतून रात्री त्या रस्त्याकडे पाहिलं की, कसं सुनं सुनं वाटतं.

एक पोरका प्रकाश तुमच्या नजरेचं बोट धरून तिला घेऊन जातो.

रात्री या खिडकीशी मी तास न् तास उभा असतो.

घरातले सारे दिवे विझवून.

मी एकटा आहे अन् घर फार मोठं आहे.

अवनीन्द्रही एकटाच आहे.

त्याचंच हे घर.

अवनीन्द्र फिरतीच्या नोकरीत आहे.

महिन्यातून किती तरी दिवस त्याला बाहेरच रहावं लागतं.

म्हणून त्यानं या घरात मला ठेवलं.

घराच्या रक्षणासाठी ?

छे ! विहिरीच्या रक्षणासाठी !

हे थोडंसं विचित्र आहे.

तो रस्ता आणि अवनीन्द्रचं हे घर यांच्यामध्ये घराच्या मालकीच्या मर्यादेत एक मोठी विहीर आहे.

या विहिरीत बऱ्याच आत्महत्या झालेल्या आहेत.

आजुबाजूला चार घरं असूनही एकटं वाटावं असं घराचं ठिकाण.

अशा घराच्या परिसरातली विहीर.

तीही अशा एकट रस्त्याच्या बाजूला.

म्हणजे संधी साधून कुणालाही पटकन् आत्महत्या करता यावी.

अवनीन्द्र घरी असला की तो लक्ष ठेवतो.

पण तो फिरतीवर गेला की कशी बेमालूम आत्महत्या होऊन जाते.

या अर्थानं ही विहीर कर्णोपकर्णी झाली आहे.

अन विहिरीच्या अनुषंगानं घरही.

अवनीन्द्रला हे आवडलेलं नाही.

त्याला या विहिरीचा अन् म्हणून घराचा असा दुर्लौकिक नको आहे.

अवनीन्द्र तसा आधुनिक विचारांचा.

पण कितीही नाही म्हटलं तरी, घरापासून केवळ श्वासाच्या अंतरावर चालणारं हे मृत्यूचं तांडव त्याच्या मनावर विलक्षण दडपण आणून राहिलं आहे.

एक अनामिक भीती त्याच्या मनात निर्माण झाली आहे.

एकूण, त्याला या विहिरीवर आत्महत्या व्हायला नको आहे.

म्हणून त्यानं मला इथं आपल्या घरात ठेवलं.

तो नसला की, विहिरीवर लक्ष ठेवायला.

कुणाला आत्महत्या करू न द्यायला.

मी जो रात्री–अपरात्री या खिडकीशी उभा राहून त्या प्रकाशमय रस्त्याच्या दूरच्या टप्प्यापर्यंत नजर लावून ठेवतो, तो एका प्रतीक्षेत.

या प्रतीक्षेची जात वेगळी.

या विहिरीवर जेवढ्या आत्महत्या झाल्या तेवढ्या साऱ्याच्या साऱ्या दुसऱ्या गावाच्या लोकांच्या आहेत.

म्हणजे हा रस्ता या गावाला पलिकडच्या ज्या गावांशी जोडतो, त्याचपैकी कोणत्या ना कोणत्या गावची व्यक्ती आपल्या गावावरून उठून सरळ इकडे येते अन् इथं आत्महत्या करते.

गावातल्या एकानंही अजूनपर्यंत या विहिरीत आत्महत्या केलेली नाही.

अवनीन्द्र म्हणतो, " दुसऱ्या गावची माणसं मरायला इथं येतात. "

एरवी रात्री या रस्त्यानं गावातून जाताना कुणी दिसत नाही.

येतानाही कुणी दिसत नाही.

मात्र, ज्या रात्री या विहिरीत आत्महत्या होते, त्या रात्री नक्कीच कुणी तरी या रस्त्यानं गावात येत असला पाहिजे.

या रस्त्याला तेवढ्यापुरती जाग येत असली पाहिजे.

अशा रस्ता जागविणाऱ्या माणसाची मी प्रतीक्षा करतो.

कारण मला आता असं बरं वाटत नाही.

म्हणजे, विहिरीत कुणाला आत्महत्या करू द्यायची नाही म्हणून अवनीन्द्रनं मला मुद्दाम इथं ठेवलं अन् इथं मुळी आत्महत्या करायला आता कुणी येतच नाही.

कुणीतरी आलं आहे.

विहिरीच्या पाळीवर आत्महत्येसाठी उभं आहे.

अन् आपण जाऊन त्याला अडवलं आहे–मागच्या मागं ओढून घेतलं आहे.

–हे खरं आत्महत्या रोखण्याचं दृश्य.

हे असं जर होणार नाही तर मला इथं आत्महत्त्या होऊ न देण्याकरिता ठेवलं आहे, या समजण्यात अर्थ नाही.

अलिकडे हाच विचार माझ्या मनात घर करून बसला आहे.

एक मुलखावेगळी अस्वस्थता मला व्यापून टाकीत आहे.

अन् रात्री–अपरात्री या रस्त्यानं दुरून येणाऱ्या एका अज्ञात व्यक्तीनं मला झपाटून टाकलं आहे.

एक अनामिक ओढ निर्माण झाली आहे.

अवनीन्द्रा, या कसल्या रे विचित्र ओढीशी मला आणून उभं केलंस तू ?

● ●

## २३ : एकाकी

तलावावर पाऊस पडत असताना तो पाहणारे आपण चार चौघात असूनही मनानं असे एकदम एकाकी कां बनतो ?

या तलावाची एक गंमत असते.

टेकडीसारखा एक उंचवटा वाकडया–तिकडया वळणांनी चढत जायचं.

चढता चढता इतकं वर जायचं की समोर एकदम तलाव.

चढण वाकडी–तिकडी तर असतेच,

पण काटयागोटयाचीही असते.

हे काटेगोटे तुडवायचे कशाला ?

गावापासून तब्बल पाच मैलांची रपेट मारत पायी यायचं.

ते टेकाड चढायचं.

कपडे फाडून घ्यायचे.

पाय रक्तबंबाळ करायचे.

अंगाला ओरखडे पाडून घ्यायचे.

अन् हे सारं करून वर जाऊन पाहायचा तो विस्तीर्ण तलाव.

शान्तमग्न.

अन् हे सारं जेव्हा कोसळत्या पावसात करावं लागतं तेव्हा सारा देह दिशा

बनून जातो.

म्हणजे मग देहातूनच पाऊस कोसळतो.

देह पाऊस बरसणाऱ्या दिशा बनतो म्हणून मन एकाकी होत असेल का ?

मन एकाकी बनतं एवढं मात्र खरं.

एकाकी म्हणजे इतकं एकाकी की जणू वलिसाहेबाचा दर्गा.

हा दर्गा मला नेहमीच एकाकी वाटतो.

ज्या तलावावर पाऊस पडतो त्या तलावाच्या वाटेवर हा दर्गा आहे.

भरवस्तीच्या टोकाला वस्ती निमुळती होत येते अन् वलिसाहेबाचा दर्गा तिचं टोक बनतो.

त्या टोकाला डावीस घालून जो रस्ता गावातून सळसळत बाहेर निघतो त्याच रस्त्यानं पाच मैल चालून जायचं.

अन् तलाव जवळ करायचा.

तलाव जसजसा जवळ येतो तसतसा धबधब्यासारखा एक आवाज लहानाचा मोठा होत जातो.

तलावाचा बांध ओलांडून खाली उसळणारं तलावाचंच ते पाणी.

हा आवाज कुठवर ऐकू येत नाही अन् कुठून ऐकायला यायला लागतो हे अजूनपर्यंत नक्की सांगता आलेलं नाही.

आवाजाचं अलिकडचं टोक धरून पलिकडच्या टोकाकडे जाताना, नवस केल्यापासून फेडण्यापर्यंतच्या प्रवासासारखं वाटतं.

आपण दर्गा ओलांडून येत असतो म्हणून तसं वाटतं कां ?

कोण जाणे !

पण या आवाजाला नवसाच्या जाणिवेशिवाय दुसरी कोणतीच जाणीव नसते.

आपण तलाव पाहून परततो तेव्हा–

त्या आवाजाचा नवस फेडल्यापासून तो करीपर्यंतचा प्रवास असतो.

म्हणजे पाच मैलांचं अंतर तोडून जेव्हा आपण पुन्हा वलिसाहेबाच्या दर्ग्याशी येतो तेव्हा तो नवस घेऊनच येतो.

नवस आपल्या एकट्याचाच असतो.

म्हणजे नवसातही आपण एकाकीच.

त्या दर्ग्याच्या आत कधी जायला मिळालं नाही.

म्हणूनच दर्गा एकाकी वाटत असेल.

दर्ग्याच्या जवळ राहणारी माझी आत्या एकाकी होती.

दंग्याचा वणवा भडकला होता.

आत्याचे यजमान बाहेरगावी गेले होते.

आत्या घरात एकटीच होती.

काही गुंड आत्याच्या घरावर चालून आले.

समोरच्या बंद दारावर धक्के देऊ लागले.

आत्याचं घर वरच्या मजल्यावरचं.

समोर धक्के पडत असताना आत्यानं घराच्या मागच्या बाजूची खिडकी उघडली अन् जीवाच्या आकांतानं खाली उडी घेऊन दर्ग्याकडे पळत सुटली.

दर्ग्याच्या आत लपून बसली.

एकाकी दर्ग्यानं एकाकी आत्याला आश्रय दिला.

असं काही घडलं की एकाकीपणाला अर्थ फुटतो.

तलावावर पाऊस पडत असताना येणारा एकाकीपणा फक्त एकाकीपणाच असतो.

बांधावरून उसळणाऱ्या पाण्याचा आवाज ज्या नवसात घेऊन जातो त्या नवसातला एकाकीपणाही फक्त एकाकीपणाच असतो.

आत्याच्या कहाणीनं दर्ग्याच्या एकाकीपणाला मात्र एक अर्थ दिलेला असतो.

दर्ग्याच्या एकाकीपणाला आणखीही एक अर्थ आहे.

पहाटे मी आईच्या कुशीत खूप सुरक्षित झोपलेला असतो.

माझ्या घराच्या उजव्या अंगणाला एक रस्ता आहे.

रस्त्याच्या पलिकडे एक मुसलमानाचं पडकं घर.

रोज पहाटे एक फकीर त्या घरांच्या तोडाशी येऊन उभा राहतो आणि बांगेची ललकारी देतो.

त्या नीरव पहाटे ती ललक र विलक्षण एकाकी असते.

ही ललकार देणारा फकीर त्या वलिसाहेबाच्या दर्ग्यातून आलेला आहे अशी माझी मनोमन खात्री असते.

ही ललकार मला जागी करते.

माझ्या देहभर पसरते.

अन् आईच्या कुशीत झोपलेला असूनही मी खूप एकाकी बनून जातो.

वलिसाहेबाचा तो एकाकी दर्गा माझ्या एकाकी आत्याला आश्रय देऊन सोबत करतो.

त्याच दर्ग्यातून बाहेर पडलेला एक एकाकी फकीर भल्या पहाटे बांगेची एक एकाकी ललकार देतो अन् आईच्या कुशीच्या सोबतीला झोपलेल्या मला एकदम एकाकी करून टाकतो.

● ●

## २४ : माझ्या प्राजक्तीची सकाळ

सकाळीसकाळी असं आभाळ भरून आलेलं मला आवडत नाही.

म्हणजे मला राग येतो किंवा मी चिडतो, अशातला भाग नाही.

पण ते मला आवडत नाही.

चिडायची मैत्रायणी.

कॉलेजच्या कॉरिडॉरमध्ये उभी राहून खाली वाकलेल्या आभाळाला वेडावत आपल्या किंचाळल्यासारख्या आवाजात ती चीडचीड चिडायची.

तिचं हे म्हणणं मला पटलं की, सकाळ कशी सकाळसारखीच असायला पाहिजे.

उगवायला पाहिजे.

आभाळ असं मेघजड झालं की, हे उगवणंच क्षितिजाशी असं अडून बसतं.

मग जो दिवस वाटचाला येतो तो न उगवलेला असतो.

मैत्रायणी पण एकदम ग्रेटच.

त्या भरल्या कॉलेजमध्ये साऱ्यांसमोर चक्क माझा हात धरायची अन् मला ओढत नेत गर्दीतून बाहेर काढायची.

मलाच म्हणायची, " तुला काही म्हणता काऽऽही कळत नाही. अगदीच खुळा आहेस ! "

असेन बापडा !

तिला हवा होतो तसा काही मी बदललो नाही.

तिचं म्हणणं असं की, मी मनानं अलिप्त अलिप्त असतो.

मला समरसून, रसरसून आयुष्य उपभोगता येत नाही.

माझ्या अशा वृत्तीमुळं मी जीवनातल्या उत्कट आनंदाला मुकतो, असं तिचं स्पष्ट मत.

मैत्रायणीचं मत काही अगदीच चुकीचं नाही.

पण मी तिला उलट असं पटवून देण्याचा प्रयत्न केला की, याच वृत्तीमुळं मला दुःखाचे हल्ले सहज परतवता येतात.

मी खूप आनंदी होत नाही, तसाच खूप दुःखीही होत नाही.

मी माझ्या मनाचं असं विश्लेषण करायला लागलो, तेव्हा ती खूप एकाग्रतेनं ऐकायला लागली.

दोनेक तास तरी बोललो असेन.

तिनं एकही शब्द सुटू दिला नसावा.

"आपण एकेका घटनेकडे कसं पाहतो, यावरच पुष्कळसं अवलंबून आहे," ती गंभीर स्वरात म्हणाली.

मी म्हणालो, "तुला एक घटना सांगतो, मैत्रायणी. माझ्या घराच्या मागच्या अंगणात प्राजक्तीच्या फुलांचा सडा पडलेला ज्या सकाळी मी पहिल्यांदा पाहिला ना, ती सकाळ माझ्या वडिलांच्या मरणाची होती. वडील गेले आणि मी मागच्या अंगणात आलो, तो हा सडा पडलेला !"

"तुझी त्यावेळची मनःस्थिती मी समजू शकते," मैत्रायणी म्हणाली, "पण आता इतकी वर्षं उलटल्यानंतर तुला त्या घटनेचा वेगळा अर्थ लावताच येणार नाही का ?"

मी गप्प.

तीच म्हणाली, "मृत्यू तुझ्या वडिलांपाशी आला, तो घराच्या मागल्या दारानं, प्राजक्तफुलांच्या पायघड्यांवरून चालत आला."

मैत्रायणी घटनांचे अर्थ छान लावायची.

करुणाकरन्सुद्धा छान लावायचा.

त्यानं त्या घटनेचा वेगळाच अर्थ सांगितला. म्हणाला, "या जगातून निघून जाताना तुझ्या वडिलांनी प्राजक्ताचं दान तुझ्या आयुष्याच्या झोळीत टाकलं."

मैत्रायणीचा अर्थ अन् करुणाकरन्चा अर्थ यात वेगळेपणा असा की, मैत्रायणीनं मृत्यूचं उदात्तीकरण केलं, तर करुणाकरन्नं माझ्या वडिलांचं.

मी यापैकी एकही अर्थ स्वीकारू शकत नाही.

कुणाचंही आणि कशाचंही उदात्तीकरण न करता लावले गेलेले अर्थच तेवढे मी स्वीकारतो.

कुठल्याही घटनांचे.

करुणाकरन्नं 'मधुमती' पिक्चर सहा वेळा बघितला.

मी विचारलं, "त्या पिक्चरमध्ये असं विशेष काय आहे?"

"तुला कळायचं नाही," तो म्हणाला, "मधुमती म्हणजे खरीखुरी निसर्गकन्या. पहाडाची मुलगी. तिचं चालणं, बोलणं, चेहऱ्यावरचे भाव, डोळ्यातले भाव–सारं काही निसर्गाशी ताल धरणारं. तिचं साधं चालणं म्हणजेसुद्धा मोराच्या नृत्यासारखं नृत्य. आणि तिचा मृत्यू? पावसाच्या कोसळण्यात तिचं कोसळणं विलीन झालेलं."

करुणाकरन् 'मधुमती'बद्दल फार बोलायचा–सारखा बोलायचा.

'मधुमती'चा त्याला कळलेला तो अर्थ होता.

म्हणजे शेवटी मधुमतीच्या चालण्याचं, बोलण्याचं, चेहऱ्यावरच्या अन् डोळ्यांमधल्या भावाचं आणि प्रत्यक्ष मृत्यूचंसुद्धा उदात्तीकरण आलंच.

तरी आपण करुणाकरन्‌ला मानलं.

पण करुणाकरन्‌ही बेटा मैत्रायणीसारखाच सकाळच्या अभ्राच्छादित आभाळावर चिडून उठायचा.

कशाचं तरी, कुणाचं तरी उदात्तीकरण केल्याशिवाय घटनेचा अर्थ लावताना काही काही माणसं अशीच चिडतात.

मैत्रायणीची खरी चीड सकाळी आभाळ भरून आलं म्हणून नसते– करुणाकरन्‌चीही नसते.

या घटनेचा अर्थ लावताना कशाचंच उदात्तीकरण करता येत नाही, म्हणून त्यांची चीड असते.

मी चिडत नसतो.

ते आभाळ मी सरावल्यासारखा स्वीकारतो.

कारण जिच्यात मला काहीही उदात्त दिसलं नाही, अशी जगातली अत्यंत मूलभूत घटना माझ्या रक्तात भिनून गेलेली असते.

माझ्या आयुष्यातला प्राजक्तीचा पहिला बहर मृत्यूनं झाकोळलेला असतो.

माझ्या प्राजक्तीची सकाळ ढगाळलेली असते.

● ●

## २५ : अधिपती

नदी पार करताना कळवंडून आलं.

तसं काही एकदम काळवंडलं नाही.

संध्याकाळ वाटेतच झाली होती.

अन् तीरावर उभा होतो तेव्हा संधिप्रकाश होता.

नदीतून दोन माणसं माझ्या दिशेला येत होती अन् तीन माझ्या दिशेकडून समोरच्या दिशेकडे चालली होती.

मी त्या सर्वांचं येणं–जाणं संपू दिलं अन् एकटा नदीत उतरलो.

आता आसपास कुणीच नाही.

अर्ध्यावर आलो तो पाणी छातीएवढं.

नदीत एकटं छातीएवढ्या पाण्यात उभं रहायचं अन् चहुकडून आपल्या रोखानं येणाऱ्या अंधाराला आपल्या अस्तित्वाच्या गाभाऱ्यापर्यंत थेट पोचू द्यायचं.

स्वप्नात ऐकलेल्या अनोळखी हाकेसारखा अनुभव.

त्या तशा स्थितीत फक्त पाऊलभर उभा राहिलो.

पैलतीर गाठायचा अन् अधिपतींच्या गावाला जाणाऱ्या पाऊलवाटेला लागायचं.

अधिपतींच्या गावचे दिवे दिसत नाहीत, पण गजर अस्पष्ट ऐकू येत आहे.

दुरून अस्पष्ट ऐकू येणाऱ्या गजराइतकी आत्म्याची स्पष्ट खूण जगात दुसरी कोणतीच नाही.

अधिपतींच्या गावचे दिवे दुरून कधीच दिसत नाहीत.

म्हणजे आपण गावापासून पाव फर्लांग असलो, तरी दिसत नाहीत.

जवळ आलो की, एकदम एका क्षणात सारे दिवे दिसतात.

प्रकाश उलगडत असा जात नाही–समोर उभाच ठाकतो.

नदीतल्याप्रमाणेच आता पाऊलवाटेवरही एकटाच आहे.

अधिपती रात्री केव्हातरी गाव सोडणार एवढंच कळलं.

नक्की वेळ कळली नाही.

म्हणून लवकर पोचण्याची घाई.

हा जो गजर अस्पष्ट ऐकू येत आहे, तो अधिपतींना निरोप देण्याच्या गाव–सोहळ्याचा कळसाध्याय आहे.

म्हणजे गजर जेव्हा ऐकू येईनासा होईल, तेव्हा अधिपती गाव सोडून निघून गेलेले असतील.

गजर ऐकू येणं थांबता कामा नये.

अधिपतींची प्रत्यक्ष भेट अशी होणारच नाही.

भेटलो तर अधिपती ओळखणारही नाहीत.

पण त्या तेवढ्या गर्दीत भेट अशक्यच.

अधिपधींना फक्त दुरून बघायला मिळालं तरी पुरे.

अधिपती माझ्याशी बोलले कधीच नाहीत.

माझ्याकडे पाहून फक्त हसले होते–तेही एकदाच.

मी पालखी खांद्यावर घेतली तेव्हा.

अधिपतींच्या मठात गुरुवारी पालखी निघते.

अधिपती स्वतः पालखीचं पुढारीपण करतात.

पालखीची वेळ प्रकाशानं नुसती न्हाऊन निघालेली असते.

दिवे–पुन्हा दिवे–अन् पुनः:पुन्हा दिवे–दिवेच दिवे !

त्यात चांदीची लख्ख मूठ असलेला दंड शरीरापुढे तिरपा धरून अधिपतींचं पालखीच्या बाजूबाजूनं पालखीबरोबर चालणं.

अधिपतींचं हे चालणं म्हणजे त्यांच्या जगण्याचा आशय.

पालखीला गर्दी असते.

या गर्दीनं पालखीच्या मागून पालखीच्या गतीनं चालायचं.

गर्दी असली तरी झुंड नसते.

गर्दीतही प्रत्येकाचं एक स्थान असतं.

पालखीबरोबर म्हणावयाच्या सामूहिक पदांनी गर्दीला आकार दिलेला असतो.

त्या गर्दीत मी एक होतो.

अगदी नवखा.

वाट चुकल्यासारखा.
पदं म्हणणाऱ्या आजुबाजूच्या तोंडांकडे चोरटचासारखा पाहणारा.
पालखीपासून दूर.
गर्दीतून वाट काढीत कुणीतरी माझ्या कानापर्यंत आलं.
आलेल्यानं हळूच सांगितलं,
"अधिपती म्हणताहेत, पालखी घ्या."
अधिपती मला म्हणताहेत ?
मला ?
...म्हणजे...मी ?
आलेला कानात सांगून निघूनही गेला.
गर्दीतून वाट काढीत पालखीशी आलो.
बाजूनं चालणाऱ्या अधिपतींकडे पाहिलं.
अधिपती फक्त हसले.
मी पालखी खांद्यावर घेतली अन अधिपतींनी स्वतः पदाला सुरुवात केली.
असा दचकलो !
अरे, हे पद असं यावेळी, या ठिकाणी अकस्मात् कसं आलं ?
हे तर माझे वडील म्हणायचे !
मी हे फक्त त्यांच्याच तोंडी ऐकलं होतं.
हे म्हणणारं आजपर्यंत दुसरं कोणी शोधूनही सापडलं नव्हतं.
वडील असतानाही सापडलं नव्हतं.
अन् नसतानाही सापडलं नव्हतं.
वीस वर्षांपूर्वी वडील वारले अन् हे पद मुकं झालं.
आज अधिपतींनी एकदम या पदाला वाचा दिली.
मी आतून ढवळून निघालो.
अधिपती शांतगंभीरपणे सावकाश पद म्हणत पुढं चालले होते.
मी ढवळलो–ढवळलो–अन् एकदम मला आयुष्याचा सूर सापडला.
वीस वर्षांपूर्वी हरवलेला.
अधिपतींचे माझ्यावर हे उपकार आहेत.

–म्हणूनच अधिपतींनी गाव सोडण्याच्या आधी मला त्यांच्या गावी पोचलं पाहिजे.

अधिपती तपश्चर्येसाठी निघून चालले आहेत.
मी नदी पार करून पाऊलवाटेला लागलो आहे.
हरिनामाचा गजर दुरून अस्पष्ट ऐकू येत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२९३८
23454

REFBK-0023585



वितरक :-
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४००००४.

वसुधा प्रकाशन
नागपूर